दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२११ | शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### विद्यार्थी आत्महत्या चिंतनाचा गंभीर विषय

विद्यार्थी व्यक्तिमत्व फुलण्याच्या दिवसात आत्महत्या का करत असावेत? जालन्याची आरोही चिटलान आणि सांगलीचा शौर्य पाटील यांनी केलेल्या आत्महत्यांमुळे हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या २०२३ च्या अहवालानुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकवर आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला एक वर्ष स्थगिती

## निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारचा निर्णय, सहकारी कर्जाचेही होणार पुनर्गठन

मुंबई । प्रतिनिधी

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या कर्जाच्या वसुलीला एक वर्षे स्थगिती देण्यात आली आहे. पूर परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.**



जून ते सप्टेंबर यादरम्यान राज्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आता त्यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. त्याचसोबत सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्याचे आदेशही राज्य सरकारने दिले आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ▶▶ पान २ वर

> **३० जून पर्यंत कर्जमाफी होणार**
> एकीकडे दुष्काळ तर दुसरीकडे पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकरी अडचणीत आला. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी अशी मागणी सातत्याने केली जात होती. प्रहारचे नेते आणि माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली त्यासाठी एक मोठे आंदोलनही झाले. त्यानंतर राज्य सरकारने पुढच्या ३० जून पर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे.

# 2 डिसेंबरपर्यंतच युती टिकवायची !

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांच्या विधानाने खळबळ, महायुतीत तणाव वाढला

जळगाव । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीदरम्यान महायुतीत धुसफूस सुरुच आहे. याच दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी, मला २ तारखेपर्यंत युती टिकायची आहे असे विधान केल्याने खळबळ उडाली आहे. यातच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी चव्हाणांवर पैसे वाटल्याचा आरोप केला. हे खोटे असून मी नंतर यावर उत्तर देईन, असे चव्हाण यांनी म्हटले आहे. चव्हाण यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांणा उधाण आले आहे. २ तारखेनंतर काय होईल? युती टिकेल की नाही, यावरुन तर्कवितर्क लढवले जात आहेत.



रवींद्र चव्हाण हे गुरूवारी नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यादरम्यान, त्यांनी सध्याच्या राजकीय घडामोडीवर प्रतिक्रिया दिली आहे. फोडाफोडीच्या राजकारणावरुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच दिल्लीत जाऊन गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. महायुतीत भाजप आणि शिंदेंच्या सेनेत एकमेकांच्या पदाधिकाऱ्यांना पक्षात घेण्यावरुन वाद निर्माण झाला. यावरुन अमित शहांची भेट घेतल्यानंतर शिंदे यांना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचा आदेश दिला. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्याला भाजपमध्ये घ्यायचे नाही आणि भाजपच्या पदाधिकाऱ्याचा शिवसेनेत प्रवेश द्यायचा नाही, असे आदेश शिंदे यांनी दिल्याचे मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले होते. नुकतेच शिंदे सेनेचे आमदार निलेश राणे यांनी मालवणमधील एका भाजप पदाधिकाऱ्याच्या घरात जाऊन स्टिंग ऑपरेशन केले. त्या घरात पैशांची एक बॅग आढळून आल्याचा आरोप निलेश राणे यांनी केला. हे स्टिंग ऑपरेशन त्यांनी सोशल मीडियावर लाईव्ह ▶▶ पान २ वर

# आष्टीतील शरद पवार गटाच्या नेत्यावर प्राणघातक हल्ला

## राम खाडे गंभीर;आहिल्यानगरमध्ये उपचार सुरू

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्यात नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. निवडणुक प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असताना बीडमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राम खाडे यांच्यावर प्राणघातक हल्ल्याची घटना समोर आली आहे.

बीडमधील आहिल्यानगर -बीड जिल्ह्याच्या सीमेलगत मांदळी गावा जवळ रस्त्यावर हा हल्ला झाला आहे. दहा ते पंधरा जणांनी धरदार शस्त्रांनी गाडीवर ▶▶ पान २ वर

### कोणतीही चौकशी लावा–आ.धस

राम खाडे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणात आपले नाव विनाकारण घेतले जात असल्याचा निषेध आ. सुरेश धस यांनी नोंदवला आहे.या प्रकरणाशी त्यांचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी गैरजबाबदारपणे लोकप्रतिनिधींवर आरोप करण्याची प्रवृत्ती चुकीची आहे. हल्ल्याबाबत प्रतिक्रिया देताना आ.धस म्हणाले की, महाविकास आघाडीचे सरकार असतानाही असेच आरोप राम खाडे करत होते. त्यावेळी माझ्यावर एसआयटी मार्फत चौकशी करण्यात आली होती.मात्र सत्य लपून राहत नाही न्यायदेवतेने देखील त्यावेळी माझा कसल्याच प्रकारचा कुठेही संबंध नसल्याचे सांगितले होते. आत्ताही संबंधित राम खाडे यांच्यावर झालेल्या हल्ल्याशी माझा कोणताही संबंध नाही.विनाकारण लोकप्रतिनिधींचे नाव घेऊन बदनाम करण्याचा प्रयत्न योग्य नाही.या प्रकरणी जी काही चौकशी आवश्यक असेल ती संबंधित यंत्रणांनी पूर्णपणे आणि निष्पक्षपणे करावी असेही आ. धस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



# शेतवस्तीवरील घराला आग लागून २२ क्किंटल कापूस जळून खाक



शिरूर । प्रतिनिधी

**शेतात काम करण्यासाठी वृद्ध शेतकरी दांम्पत्य गेल्यानंतर पाठीमागे घराला आग लागून, संसारपयोगी साहित्यासह सुमारे २२ क्किंटल कापूस जळून खाक झाल्याची घटना शिरूर तालुक्यातील नारायणवाडी (जोडवाडी) येथे घडली आहे. या आगीमध्ये शेतकऱ्यांचे सुमारे दोन ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे.**

शिरूर कासार तालुक्यातील मौजे नारायणवाडी या गावचे रहिवासी असलेले चंद्रहास नरहरी शिंगटे या शेतकऱ्याची अगदी अर्धा कि.मी. अंतरावरच जोडवाडी-सैदापूर (ता. गेवराई) शिवारामध्ये गट नंबर १९९ मध्ये सुमारे अडीच एकर जमीन आहे तर शेजारची काही जमीन बटाईने केलेली होती. या दोन्हीही जमिनीमध्ये मोठ्या कष्टाने कापसाचे पीक घेतले होते. या पिकालाही जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचाही मोठा फटका बसला होता. उरलेसुरले कापसाचे पीक सुमारे १२ ते १३ रुपये प्रतिक्किंटल या दराने मजुराकडून वेचून घेतले होते. तर सौ.सुरेखा चंद्रहास शिंगटे हे दांपत्य अगदी कापूसाच्या लागवडीपासून ते वेचणी पर्यंत शेतामध्येच राब राब राबत होते. ▶▶ पान २ वर

# एसपी साहेब पोलिसच झाले लुटारू न्याय कुठे मागायचा

## लॉजवर थांबलेल्या एका सराफा व्यापाऱ्याला डांबून ४ लाख लुटले

बीड । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा सातत्याने चर्चेत आहे. जिल्ह्यात अनेक गुन्हेगारी प्रकरणं समोर येत आहेत. बऱ्याच गुन्ह्यांमध्ये पोलिसांचा सहभाग असल्याचे देखील निष्पन्न झाले आहे. आता पुन्हा एकदा बीडसह संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणारी घटना समोर आली आहे. बीडमध्ये लॉजवर थांबलेल्या एका सराफा व्यावसायिकाला चक्क पोलीस अधिकाऱ्याने आणि इतर पोलिसांनी ४ लाखांना लुटले आहे.

यातील प्रमुख असलेले गजानन क्षीरसागर हे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार्यरत होते त्यांनीच गुन्हेगाराप्रमाणे सापळा रचून ही लूट केली. आरोपी पोलीस एवढ्यावरच थांबले नाहीत. तर त्यांनी संबंधित सराफा व्यावसायिकाला रात्रभर एका दुसऱ्या लॉजवर डांबून ठेवले. हा सगळा प्रकार घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी सराफा व्यापाऱ्याने पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली. ▶▶ पान २ वर

> **तडजोड आणि मिटवामिटवी**
> सदर घटना घडल्यानंतर एकाच खळबळ उडालेली असताना, आणखी प्रकरण वाढू नये यासाठी संबंधित व्यापारी-संघटना पदाधिकारी आणि पोलीस यांच्यात बराचवेळ खल झाला. त्यानंतर हे प्रकरण न वाढवता येथेच थांबवण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे. शिवाय संबंधितांची रक्कम परत करण्यात आल्याची देखील चर्चा आहे. या नंतर हे प्रकरण मिटवण्यात आले असे समजते.

# दिशा सालियनच्या मृत्यूची चौकशी आणखी किती काळ

## मुंबई उच्च न्यायालयाचा पोलिसांना सवाल

मुंबई । प्रतिनिधी

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यूची चौकशी शहर पोलिस किती काळ करणार, असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने केला आहे. ८ जून २०२० रोजी मालाड येथील एका निवासी इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून तिचा मृत्यू झाला. त्यानंतर शहर पोलिसांनी अपघाती मृत्यूचा खटला दाखल केला.

न्यायमूर्ती ए एस गडकरी आणि ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२५ नोव्हेंबर २०२५
आवक क्किंटलमध्ये तर भाव प्रतिक्किंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९०.०० क्किंटल | २,४११ | ३,०६० | २,७५० |
| ज्वारी/हायब्रिड: १४१.०० क्किंटल | २,२६० | ४,००० | २,९९० |
| मका/लोकल: ७.०० क्किंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्किंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १९.०० क्किंटल | ३,००० | ५,३५१ | ४,५९२ |
| बाजरी: ६९.०० क्किंटल | २,१७१ | ३,५०० | २,८४९ |
| मुग: २.०० क्किंटल | ५,१०१ | ५,१०१ | ५,१०१ |
| सोयाबीन: १८१.०० क्किंटल | ४,४०० | ४,६५० | ४,५७१ |
| हरभरा: १.५० क्किंटल | ४,५०० | ५,२५१ | ४,९५० |

## थोडक्यात...

### दोन कोटींहून अधिक आधार क्रमांक निष्क्रिय

मुंबईः देशभरात आधार डेटामधील अचूकता कायम ठेवण्यासाठी युआयडीएआय (विशिष्ट ओळख प्राधिकरण) सातत्याने काम करत आहे. या मोहिमेचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून, देशातील दोन कोटींपेक्षा जास्त मृत व्यक्तींचे आधार क्रमांक अधिकृतपणे निष्क्रिय करण्यात आले आहेत. मृत व्यक्तींच्या नावावर आधार सक्रिय राहिल्यामुळे आर्थिक फसवणूक, कल्याणकारी योजनेतील गैरवापर आणि ओळख दुरुपयोग होण्याची शक्यता वाढते. हे सर्व थांबवण्यासाठी युआयडीएआय ने मोठ्या प्रमाणात मोहीम राबवली असून, ही मोहीम पुढेही सुरू राहणार आहे.

### मुंबईतील १०.६४ टक्के मतदारांची नावे डुप्लिकेट

मुंबईः राज्य निवडणूक आयोगाने शेअर केलेल्या आकडेवारीनुसार मुंबईतील १.०३ कोटी मतदारांपैकी जवळपास १०.६४ टक्के म्हणजेच ११ लाखांहून अधिक मतदारांची मतदार यादीत डुप्लिकेट नोंदणी झाली असल्याचे समोर आले आहे. आकडेवारीवरून, सर्वाधिक डुप्लिकेट मतदार असलेल्या बहुतेक वॉर्डांमध्ये पूर्वी विरोधी पक्षाच्या नगरसेवकांचे प्रतिनिधित्व होते. आयोगाने हरकती सादर करण्याची अंतिम मुदत २७ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर पर्यंत वाढवली आहे. आयोगाने जारी केलेल्या निवेदनानुसार अंतिम मतदार यादी १० डिसेंबर रोजी प्रकाशित केली जाईल. गेल्या आठवड्यात प्रकाशित झालेल्या प्रारूप मतदार यादीत ४.३३ लाख मतदार एकापेक्षा जास्त वेळा आढळले आहेत.

### प्रचार सभेला चक्क आशा, अंगणवाडी सेविकांची हजेरी

बुलडाणाः मलकापूर येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. मात्र या सभेसंदर्भात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या सभेला हजर राहण्यासाठी चक्क शासकीय सेवेत असलेल्या आशा गटप्रवर्तकानेच तालुक्यातील आशा व अंगणवाडी सेविकांना या प्रचार सभेला हजर राहण्याचे आदेश दिल्याची माहिती आता समोर आली आहे. व्हॉट्सॲपवरून हा आदेश पाठवण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, अजितदादांच्या या सभेला अनेक आशा व अंगणवाडी सेविका हजर राहिल्या आणि त्याही चक्क गणवेशात. त्यामुळे सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे.

### दिव्यांगांसाठी कायदा करा–सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्लीः दिव्यांगांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी कठोर कायद्याची आवश्यकता अधोरेखित करताना, सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्राला एससी-एसटी कायद्याच्या धर्तीवर अपंग आणि दुर्मिळ अनुवांशिक विकार असलेल्या व्यक्तींची खिल्ली उडवणाऱ्या अपमानास्पद टीकेला दंडनीय गुन्हा ठरवण्यासाठी कायदा तयार करण्याचा विचार करण्यास सांगितले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जमातींच्या सदस्यांविरुद्ध जातीवादी अपशब्द, भेदभाव, अपमान आणि हिंसाचार करणाऱ्यांना गुन्हेगार ठरवतो आणि गुन्हे अजामीनपात्र ठरवतो.

### युवाशक्ती नवी शिखरे गाठत आहेत–पंतप्रधान मोदी

हैद्राबादः आज देश अंतराळ क्षेत्रात एक अभूतपूर्व संधी असल्याचे पाहत असून खासगी क्षेत्राच्या प्रगतीमुळे भारताची अंतराळ परिसंस्था मोठी झेप आहे. स्कायरूटचे इन्फिनिटी कॅम्पस हे भारताची नवीन विचारसरणी, नवोन्मेष आणि युवाशक्तीचे प्रतिबिंब आहे. युवकांची जोखीम घेण्याची क्षमता आणि उद्योजकता नवीन उंची गाठत आहे. आगामी काळात जागतिक उपग्रह प्रक्षेपण परिसंस्थेत भारत आघाडीचा देश म्हणून कसा उदयास येईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी हैदराबाद येथे स्कायरूटच्या इन्फिनिटी कॅम्पसचे दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. यावेळी ते बोलत होते.

# सोशल मीडियावरील कंटेंटवर सुप्रीम कोर्टाचे ताशेरे




## कोणीतरी जबाबदारी घेण्याबाबत केले मत व्यक्त

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**सोशल मीडियावर अपलोड केलेल्या कंटेंटसाठी (आशय) कोणी तरी जबाबदार असले पाहिजे, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि.२७) व्यक्त केले. 'इंडियाज गॉट लॅटेंट' या प्रकरणी सुनावणीवेळी न्यायालयाने हे मत मांडले.**

झालेल्या सुनावणीदरम्यान केंद्र सरकारतर्फे युक्तीवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, न्यायालयासमोरील प्रकरण केवळ अश्लीलतेशी संबंधित नाही तर विकृतीशी संबंधित आहे. ▶▶ पान २ वर

> **देखरेख यंत्रणा असेल तर अशा घटना का येत राहतात?**
> यावेळी हस्तक्षेप करत सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले की, म्हणूनच आपण एका स्वायत्त संस्थेची मागणी करत आहोत. आपल्या समाजात मुलांनाही व्यक्त होण्याचा मूलभूत अधिकार आहे. जर तुम्ही सर्व काही प्रसारित आणि प्रसारित करण्याची परवानगी दिली तर तुम्ही काय कराल? तुम्हाला अशी अपेक्षा आहे का की निष्पाप लोक स्वतःचा बचाव करतील. न्यायालयाने केंद्र सरकारला विचारणा केली की, जर देखरेख यंत्रणा असेल तर अशा घटना का येत राहतात. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला वापरकर्त्यांनी तयार केलेल्या सोशल मीडिया कंटेंटवर कारवाई करण्यासाठी नियम आणण्यासाठी चार आठवड्यांचा वेळ दिला.

# आ.बांगर यांच्या घरावर १०० पोलिसांची धाड!

हिंगोली । प्रतिनिधी

राज्यात मित्रपक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेनेतील हिंगोलीतील वाद आता चव्हाट्यावर आला आहे. कळमनुरीचे शिवसेना आमदार संतोष बांगर यांच्या घरी १०० पोलिसांनी पहाटे धाड टाकून झाडाझडती घेतल्याची माहिती विधानपरिषदेचे आमदार हेमंत पाटील यांनी दिली. भाजप आमदाराच्या दबावाखाली पोलिसांनी ही कारवाई केली असल्याचा आरोप हेमंत पाटील यांनी केला. या प्रकरणाची दखल एकनाथ शिंदे यांनी घेतली असून आपण मुख्यमंत्र्यांनाही भेटणार असल्याचे ते म्हणाले.



हिंगोली नगरपालिका निवडणुकीत शिंदेंचे आमदार संतोष ▶▶ पान २ वर

cmyk



अग्रलेख

# विद्यार्थी आत्महत्या : चिंतनाचा गंभीर विषय

विद्यार्थी व्यक्तिमत्व फुलण्याच्या दिवसात आत्महत्या का करत असावेत? जालन्याची आरोही चिटलान आणि सांगलीचा शौर्य पाटील यांनी केलेल्या आत्महत्यांमुळे हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या २०२३ च्या अहवालानुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकवर आहे. हे अजिबात भूषणावह नाही, आत्महत्या करणारी मुले पालकांच्या जीवनातून अकाली निघून जातात खरे; पण त्यांचे असे जाणे अनेक प्रश्न मात्र निर्माण करणारे ठरते. उपरोक्त अहवालानुसार २०१४ ते २०२३ यादरम्यान आत्महत्यांचे प्रमाण जवळपास ७२ टक्क्यांनी वाढले आहे, जे अस्वस्थ करणारेच आहे.

अपमान, खच्चीकरण, अनुत्तीर्ण होणे, भनकी देणे, तुलना, अपयश, अपेक्षांचा दबाव, परीक्षेचा ताण, कौटुंबिक ताणतणाव अशी कारणे सामान्यतः आढळतात, आत्महत्येची घटना घडली की समाज ढवळून निघतो. हळहळ व्यक्त होते. लोक एकत्र येतात. किंचित प्रसंगी मोर्चे काढले जातात. तथापि, त्याही पलीकडे जाण्याची आवश्यकता आहे. करण मुलांचे कायमचे निघून जाणे फक्त यांच्या कुटुंबावरच आयात करत नाही तर ते राष्ट्राचेदेखील नुकसान मानले जाते. युवा संख्येच्या बळावर देश अनेक क्षेत्रात भराऱ्या मारण्याचे स्वप्न बघतो, आत्महत्यांचे विश्लेषण करून उपाययोजना केल्या जायला हव्यात, कारण आत्महत्या करणारी व्यक्ती कोणीही असो, ती अचानक आत्महत्या करत नाही. तो निर्णय घेण्याकडे ती व्यक्ती हळूहळू ढकलली जात असू शकेल. विद्यार्थीदशेत सगळे आयुष्य शैक्षणिक प्रगतीवरून मोजले जाते. किती गुण मिळाले? कुठली शाखा घेणार आहे? कमी गुण का मिळाले? यावरून त्यांची तुलना केली जाते. पण त्याही पलीकडे आयुष्य असते, जे भरभरून जगता येते हे किती पालकांच्या लक्षात येत असू शकेल? त्यांच्यातच या जाणिवेचा अभाव असला तर त्याचा परिणाम त्यांच्या मुलांवर होणे अत्यंत स्वाभाविक, पालकांशी संवाद न साधता मुलांनी अकाली निघून जाणे हा एका अर्थी पालकत्वाच पराभव मानला जाऊ शकेल. विविध कारणांनी मुले तणावग्रस्त असतात. मनाने आजारी पडू शकतात. अशावेळी ते घरात आधार शोधतात, पालकांवर भिस्त ठेवतात, मुलांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी परा मोकळे वातावरण जपणे हे पालकांचे काम आहे, कोणतीही समस्या असली तरी घर त्यांच्या पाठीशी आहे, असा विश्वास मुलांच्या मनात आधार निर्माण करतो. तुम्ही संकटांचा सामना करू शकतात. अपयश पचवू शकतात. अर्थात, ही एकट्या पालकांची जबाबदारी नाही. शैक्षणिक संस्थाही याबाबत मोलाची भूमिका बजावू शकतात. शिक्षण संस्थांतर्गत निरामय वातावरण निर्माण करणे, हे तसे राखणे आणि रॅगिंग होऊन न देणे हे काम त्यांचेच आहे. दुर्दैवाने रॅगिंग झालेच तर संस्थात्मक पातळीवर आणि कायद्याच्या पातळीवर त्याची दखल घेऊन दोषींना चला शिकवणे हे संस्थेचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी, त्यांचा मानसिक कल किंवा त्यांची कौशल्ये शिक्षकांना जाणवू शकतात. त्यातील संभ्रम ते संपवू शकतातच. शिक्षकांना यात वेळ मिळू शकेल याची दक्षता शिक्षण संस्था देऊ शकतील, कौटुंबिक, सामाजिक आणि संस्थात्मक वातावरणाचा अभाव असणे यांसाठी सरकारही बरेच काही करू शकेल. सर्वोच्च न्यायालयानेदेखील आता पुढाकार घेतला आहे. मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणीची माहिती आठ आठवडयात सादर करावी, असे आदेश केंद्र आणि राज्य सरकारांना नुकतेच दिले. ती तत्वे सर्वोच्च न्यायालयानेच जाहीर केली होती. यासंदर्भातील सुनावणी जानेवारी २०२६ मध्ये होणार आहे. सरकार पातळीवर निर्णय घेतले तर जातात, पण अंमलबजावणीच्या पातळीवर मात्र गंडतात. सर्व शाळांमध्ये मुख्याध्यापकांच्या नेतृत्त्वाखाली 'स्कूल वेलनेस कनिटी' स्थापन करण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला होता. अशा अनेक निर्णयांचे पुढे काय होते याचा तपास जरी घेतला गेला तरी भाना पालण्याच्या दिशेने पुढचे पाऊल पडू शकेल. कारण निर्णय अंमलात आणले गेले तरच ते प्रभावी ठरतात. तेव्हा युवाशक्ती अशी अकाल कोमेजू नये यासाठी प्रयत्न कारणे ही सामूहिक जवाबदारी आहे. ती तशी पार पाडण्यातच समाजाचे हित दडलेले आहे.

## पंकजा मुंडे यांच्या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा-बाळराजे पवार

गेवराई । प्रतिनिधी



**गेवराई नगरपरिषद निवडणुकीचा धुरळा उडत असताना भारतीय जनता पार्टीने आज आयोजित केलेल्या जाहीर सभेची संपूर्ण शहरात चर्चा रंगली आहे. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी त्रिंबक (बाळराजे) पवार आणि सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस तसेच राज्याच्या मंत्री मा.पंकजाताई मुंडे या आज गेवराईत भव्य जाहीर सभेला उपस्थित राहणार आहेत.**

आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता भगवती टॉकीजसमोरील विशाल प्रांगणात होणार असून या सभेला गेवराईकरांनी विक्रमी संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजप नेते मा.बाळराजे दादा पवार यांनी केले आहे. गेल्या काही दिवसांत भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराला शहरात प्रचंड प्रतिसाद मिळत असून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गीताभाभी पवार यांच्यासह २२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांना मतदारांचा मोठा जनाधार मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. या सभेला पंकजाताई मुंडे यांच्यासह जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, माजी मंत्री बदामरावजी पंडित यांच्यासह आदींची उपस्थिती राहणार आहे. या सभेतून पंकजाताई शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, महिला - सशक्तीकरण, युवा संधी, व्यापारी सुविधा अशा विविध विकास प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करतील. व गेवराईच्या विकासाचा नवा अध्याय भाजपच्या हातूनच सुरू होईल. आजची पंकजाताईंची सभा ही विकासाची मोहर ठरणार असून या सभेला महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांनी तसेच सर्व समाजघटकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून शक्तीप्रदर्शन करावे असे आवाहन भाजप नेते बाळराजे दादा पवार यांनी केले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; भोकरदन गर्भपात प्रकरणी आरोपींना पोलीस कोठडी

जालना । प्रतिनिधी

**भोकरदन इथे अवैध गर्भपातासारख्या गंभीर आणि मानवताविरोधी कृत्यांनी भोकरदन तालुका पुन्हा एकदा हादरला आहे. मागील काही माहिन्या पूर्वी भोकरदन शहरात अवैध सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांवर कारवाई झाली असताना आता पुन्हा बुधवारी दि २६ रोजी भोकरदन तालुक्यातील नांजा वाडी येथे एका धक्कादायक घटनेत अवैध गर्भपात सुरू असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईतून उघड झाले आहे.**

या गंभीर गुन्ह्यामध्ये सामील असलेल्या दोन आरोपींना व गर्भपात करण्यासाठी आलेल्या तीन महिलांना स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने ताब्यात घेऊन पुन्हा दाखल करण्यात आला याप्रकरणी आरोपींना आज न्यायालयामध्ये हजर केले असता सदरील आरोपींना ३ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, नांजा वाडी परिसरात एका शेळीच्या गोठ्यात अवैध गर्भपात सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर, पथकाने



अत्यंत गोपनीय पद्धतीने आणि नियोजनबद्धरीत्या सदर ठिकाणी छापा टाकला. या छाप्यात, कायदेशीर परवानगी नसताना आणि कोणत्याही वैद्यकीय सुविधा नसताना महिलांचे गर्भपात केले जात असल्याचे हातावर सिद्ध झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून गर्भपातासाठी वापरले जाणारे आक्षेपार्ह साहित्य, औषधी गोळ्या सोनोग्राफी मोबाईल आणि इतर महत्त्वपूर्ण वस्तू जप्त केल्या आहेत. तर यातील मुख्य आरोपी सतीश बाळू सोनवणे, वय-३२ वर्ष, शिक्षण १२ वी रा.जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर दुसरा आरोपी केशव हरिभाऊ गावंडे, वय-४९ वर्ष, व्यवसाय-पॅथॉलॉजिस्ट, रा.सराफा गल्ली, भोकरदन, जि.जालना यातील मुख्य आरोपी सतिश बाळू सोनवणे याच्यावर मागील काळात एका खाजगी डॉक्टरांच्या हाताखाली कंपाउंडर म्हणून कार्यरत होता तिथूनच सदरील अनुभवावर तो गर्भपात करत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे तर या आरोपी वर माघील काळात गर्भपात प्रकरणी बीड,छत्रपती संभाजी नगर, जालना, जिल्ह्यात गुन्हे दाखल असल्याचे सांगितले आहे तर भोकरदन मधील आरोपी पॅथॉलॉजी चालक केशव गावंडे या आरोपी वर मागील तीन महिन्यांपासून स्थानिक गुन्हे शाखेचे पाळतवर होती मागील काळात लोकेशन मिळाले असता तेथून संबंधित आरोपी असल्याचे सांगितले जाते सध्याच्या काळात 'गर्भलिंग निदान' करून अवैध गर्भपात करण्याचा गोरखधंदा अनेक ठिकाणी सुरू आहे. नांजा वाडी येथे झालेल्या या कारवाईमध्ये देखील गर्भलिंग निदानानंतरच गर्भपाताचा प्रयत्न झाला असावा, अशी प्रबळ शक्यता वर्तवण्यात येत आहे. ताब्यात घेतलेल्या दोन आरोपींची कसून चौकशी सुरू असून, या रॅकेटचे जाळे किती दूरवर पसरले आहे आणि यात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा पोलीस करत आहेत. एकापाठोपाठ एक अवैध गर्भपात केंद्रांवर कारवाई होत असल्याने, भोकरदन तालुक्याची आरोग्य व्यवस्था आणि प्रशासकीय यंत्रणा गंभीरपणे अडचणीत आली आहे. शासनाने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या मोहिमा सुरू केल्या असताना, अशा घटना वारंवार घडणे हे दुर्दैवी आहे. स्थानिक आरोग्य विभागाने या प्रकारांकडे दुर्लक्ष केले आहे का? असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, आरोपींविरुद्ध 'पीसीपीएनडीटी ॲक्ट' आणि भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.या घटनेमुळे तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. सदरील कार्यवाही मध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पदाधिकारी ए.पी.आय. पंकज जाधव योगेश उबाळे योगेश उबाळे ए. एस.आय.राजेंद्र वाघ एपी.आय. सचिन कामगार पोलीस कॉन्स्टेबल विजय डुक्कर,दीपक घुगे, प्रशांत लोखंडे,ईशान पटेल, यांनी कारवाई केली.

## सत्तेमध्ये असताना अंबडच्या जनतेला पाणी देता येत नाही-राजेश टोपे

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद निवडणूक महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार यांच्या प्रचारार्थ नाथरेकर चौक अंबड सभेमध्ये बोलतानी माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे म्हणाले की दहा वर्षांमध्ये भाजपच्या ताब्यात असलेल्या नगरपालिकांनी शहराचा विकास रखडून ठेवला तर १५ते १७ दिवसानंतर अंबड शहरातील नागरिकांना पाणी पाणी मिळतं असे हाल या सत्तेमध्ये असणाऱ्या लोकांनी केले आहे पाणी असतानी सत्ता असताना पाणी देऊ शकत नाही. याला वांजवटी सत्ता म्हणतात. मी शासनाची जमीन घेतली ज्यांनी माझ्यावर खोटे आरोप केले त्या जमिनीवर मुला मुलींना शिक्षण घेण्यासाठी.शिक्षण संस्था तयार केल्या. त्या जागेवर काही दारूच्या दुकाना सुरू केल्या नाही असा थेट आरोप भाजपच्या आमदारावर करण्यात आला. लोकशाहीमध्ये मतदान घेतानी काहीतरी विकास करणे गरजेचे असते तसेच मी आरोग्य मंत्री व शिक्षण मंत्री असताना अंबड शहरामध्ये माझे विकास काम कुठे कुठे झाले याचा अभ्यास विरोधकांनी करणे गरजेचे आहे. विरोधकांना बघायचं असेल तर मुला मुलीचे वस्तीग्रह मत्स्योदरी संस्था पॉलिटेक्निक कॉलेज नवीन जिल्हा रुग्णालय जिल्हा न्यायालय असे अनेक विकास कामे विरोधकांनी बघून घ्यावे मग टीका टीपणी करावे असा थेट आरोप भाजपवर राजेश टोपे यांनी केला आहे आता या नगरपालिका निवडणूक मध्ये जाणता भाजपला वटणीवर आणल्या शिवा राहणार नाही यामुळे अंबड शहरातील



पाण्याच्या प्रश्नासाठी इतर अनेक प्रश्न सोडण्यासाठी महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजय करावे असे जाहीर आवाहन नागरिकांना केले आहे. यावेळी काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याण काळे , माजी मंत्री श्रीमती फौजिया खान महाविकास आघाडीचे उमेदवार श्रद्धा चांगले, सागर नामदे,समीक्षा बियाणी, संदीप खरात यांच्यासह सर्व महायुगास आघाडीचे उमेदवार होते

## कोल्हारवाडी फाटा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

### आज ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांचे किर्तन

बीड। प्रतिनिधी

**सालाबादप्रमाणे याही वर्षी भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह श्री चा दत्त जन्म सोहळा व श्रीमद् गुरुचरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला असून तरी सर्व भाविक व भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन दत्त उपासक गु. श्री. ह.भ.प.श्रीहरी महाराज पवार यांनी केले आहे.**



या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहातील दैनिक कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्रनाम, ७ ते १० गुरुचरित्र पारायण, १० ते ११ गाथा भजन, दुपारी १२ ते १ श्री ची महापूजा व आरती, २ ते ४ भावार्थ रामायण, ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, सायं. ७ ते ७.३० श्री ची महाआरती, रात्री ७.३० ते ९ प्रसाद, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन व नंतर हरिजागर होईल. शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर ह.भ.प.विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे, शनिवार दि.२९नोव्होबर ह.भ.प.केशव महाराज ( दादा) उखळीकर, रविवार दि. ३० नोव्हेंबर ह.भ.प.कबीर महाराज आतार ( झी टॉकीज,मन मंदिरा फ्रेम), सोमवार दि. १ डिसेंबर ह.भ.प.भावरत्न समाधान महाराज शर्मा ( केज), मंगळवार दि. २ डिसेंबर ह.भ.प.विव्दताप्रचुर रामरावजी महाराज ढोक ( नागपूर), बुधवार दि.३ डिसेंबर ह.भ.प.भागवताचार्य संजीवदास महाराज पाटील ( सावखेडा,पाचोरा) यांचे किर्तन होऊन गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते १ ह.भ.प.प.पु.धर्मगुरु अमृताश्रम स्वामी महाराज ( जोशी बाबा) यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होईल तरी भाविक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन दत्त उपासक गु.श्री.ह.भ.प.श्रीहरी महाराज पवार व समस्त दत्त भक्त मंडळ दत्तनगर, कोल्हारवाडी फाटा,बार्शी रोड बीड यांनी केले आहे.

# पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला एक

अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले. त्यामध्ये घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली, तसेच पशुधनाचेही नुकसान झाले. अशा स्थितीत या शेतकऱ्यांकडून काही ठिकाणी बँकांनी कर्ज वसुलीसाठी तगादा लावल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे राज्य सरकारने आता आदेश काढून कर्ज वसुलीला स्थगिती दिली आहे.

-------------

### आष्टीतील शरद पवार

हल्ला केल्याचे समोर आले आहे. या हल्ल्यामध्ये राम खाडे गंभीर जखमी असून आहिल्यानगरमधील खासगी दवाखान्यात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार राम खाडे यांच्यावर मांदळी येथे दहा ते पंधरा हल्लेखोरांनी प्राणघातक हल्ला केला. हल्लेखोरांनी राम खाडे यांची गाडी पूर्ण फोडून टाकली. त्याचबरोबर राम खाडे यांच्यासमवेत तीन ते चार जण गंभीर जखमी आहेत. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, हा हल्ला कुणी केला या संदर्भात अद्याप माहिती मिळू शकली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळावर दाखल झाले. राम खाडे यांना गंभीर अवस्थेत उपचारासाठी आहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**महेबूब शेख यांचे गंभीर आरोप**

या हल्ल्याबाबत राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांनी एक फेसबुकवर पोस्ट करून माहिती दिली. बीडचे नामांकित सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ खाडे यांच्यावर काही वेळापूर्वी अहमदनगर (आहिल्यानगर) जिल्ह्यातील मांदाळी गावातील एका हॉटेलजवळ अनोळखी व्यक्तींनी जीवघेणा हल्ला केला आहे. रामभाऊ खाडे हे गेल्या अनेक वर्षापासून भाजप नेत्यांच्या भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांचे पर्दाफाश करत आहेत. त्यामुळे घोटाळे उघड करणाऱ्या व्यक्तीवर हा हल्ला ठरवूनच करण्यात आला असावा, असा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. यापूर्वी न्यायालयाने त्यांना पोलिस सुरक्षा दिली होती, मात्र गृह विभागाने कोणाच्या सांगण्यावरून त्यांची सुरक्षा अचानक काढून घेतली, हे अत्यंत धक्कादायक आहे, असे महेबूब शेख यांनी म्हटले आहे.

------------

### २ डिसेंबरपर्यंत युती

दाखवले.यावरूनही भाजपा आणि शिंदे शिवसेनेत आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. या घटनेवर भाजप नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशा प्रकरणात पोलिसांचा तपास महत्त्वाचा असतो. निवडणूक आयोगही या काळात हस्तक्षेप करते. हे कशामुळे पैसे आले? कुठून आले? कशाकरिता पैसे आले? बेडरुममध्ये पैसे ठेवले; ते कोणत्या व्यवहारातून, प्रॉपर्टीतून आले का?. निवडणुकीत पैसे वाटताना कुणी पकडले?, याकडे निवडणूक आयोग लक्ष देते. याचा नियमाने तपास झाला पाहिजे. पोलिसही लक्ष घालतील. चुकीच्या पद्धतीने काही झाले असेल तर पोलिस, निवडणूक आयोग कारवाई करतील. पण अशा पद्धतीने एखाद्याच्या बेडरुममध्ये जाऊन स्टिंग ऑपरेशन करण्याचा अधिकार आहे का.? कारण बेडरुममध्ये जाऊन व्हिडिओ शुटिंग करणे नियमाच्या बाहेर आहे. असे बावनकुळे यांनी म्हणत निलेश राणे यांच्या कृतीवर नाराजी व्यक्त केली आहे. आता त्या पार्श्वभुमीवर भाजपा प्रदेशाध्यक्षा चव्हाण यांच्या युती तोडण्याच्या भाषेवर खळबळ उडाली असून, याची जोरदार चर्चा होत आहे.

------------

### एसपी साहेब पोलिसच झाले लुटारू

पोलिसांनीच अशाप्रकारे लूट केल्याने पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई येथील सराफा व्यापारी मयंक शांतीलाल जैन हे २४ नोव्हेंबर रोजी बीडला आले होते. रात्री उशीर झाल्याने ते बीड शहरातील विशाल लॉजवर मुक्कामासाठी थांबले होते. लॉजवर मुक्कामी असताना अचानक शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पीएसआय गजानन क्षीरसागर आणि इतर पोलीस कर्मचारी त्यांच्या रूममध्ये दाखल झाले. पोलिसांनी जैन यांच्याकडे असलेले सोने आणि मोबाईल ताब्यात घेऊन संपर्क बंद केला. दबाव टाकत सात लाख रुपयांची मागणी केली. पण जैन यांच्याकडे एवढे पैसे नव्हते. त्यामुळे आरोपी पोलिसांनी मेडिकलचे कारण सांगून बीडमधीलच दुसऱ्या एका व्यापाऱ्याकडून चार लाख रुपये मागवण्यास सांगितले. ते चार लाख रुपये रोख रक्कम गजानन क्षीरसागर यांनी घेतली. रात्रभर दुसऱ्या लॉजवर नेऊन डांबले. पहाटेच्या वेळी आरोपींनी उर्वरित तीन लाख रुपये सकाळी बारा वाजेपर्यंत आणून दे, असे म्हणून सोडून दिले. यानंतर जैन हे तातडीने पोलीस अधीक्षक कार्यालयात गेले. यासंदर्भात तात्काळ कारवाई करण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे सराफा असोसिएशनने केली आहे.

----------

### दिशा सालियनच्या मृत्यूची

आर आर भोसले यांच्या खंडपीठाने म्हटले की, मृत्यूला पाच वर्षे झाली आहेत आणि पोलिसांना फक्त हे निश्चित करायचे आहे की हा मृत्यू आत्महत्याने झाला आहे की सदोष मनुष्यवधाने. सरकारी वकील देशमुख यांनी मृत्यूची चौकशी अजूनही सुरू असल्याचे सांगितल्यानंतर खंडपीठाची ही टिप्पणी आली. अजून चौकशी का? पाच वर्षे झाली आहेत. कोणीतरी मरण पावले आहे. तुम्हाला फक्त ती आत्महत्या होती की सदोष मनुष्यवध होता हे तपासायचे असल्याची टिप्पणी न्यायालयाने केली. देशमुख यांनी न्यायालयाला सांगितले की, सर्व शक्यता नाकारण्यासाठी चौकशी बारकाईने केली जात आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी या वर्षी मार्चमध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ज्यामध्ये त्यांनी त्यांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार आणि हत्या झाल्याचा आरोप केला होता. सतीश सालियन यांनी त्यांच्या मुलीच्या मृत्यूची सीबीआय चौकशी करण्याची आणि ठाकरेसेना नेते आदित्य ठाकरे यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी केली होती. सतीश सालियन यांच्या जबाबांच्या प्रती आणि कायद्यानुसार परवानगी असलेल्या इतर मूलभूत तपासाशी संबंधित कागदपत्रे पोलीस त्यांना का देत नाहीत, असा प्रश्नही न्यायालयाने यावेळी विचारला. तो पीडितेचा पिता आहे. कायदेशीररित्या परवानगी असलेले कोणतेही कागदपत्र त्यांना दिले जाऊ शकते, असे न्यायालयाने म्हटले. याचिकाकर्त्याला कागदपत्रे पुरवण्याबाबत पोलिसांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी देशमुख यांना ११ डिसेंबर रोजी पुढील सुनावणीसाठी खंडपीठाने मुदत दिली. न्यायालयाने पोलिसांना शवविच्छेदन अहवाल सादर करण्याचे निर्देशही दिले.

-------------

### शेतवस्तीवरील घराला आग लागून

अतिवृष्टीच्या तडाख्यानंतरही वेचलेला सुमारे २२ क्विंटल कापूस शेतात राहत असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये आणून त्याची थप्पी लावली होती. याच घराला बुधवारी अचानक आग लागल्याने घरातील संसारपयोगी साहित्यासह, बाजरी, ज्वारी, गहू धाण्याची पोती, घरातील भांडे, कपडे यासह सुमारे २२ क्विंटल कापूस जळून खाक झाला आहे. या आगीमध्ये सुमारे दोन ते तीन लाखाचे नुकसान झाल्यामुळे अगदी हलाखीच्या परिस्थितीमध्ये शेतकरी संघर्षमय जीवन जगत असताना या शेतकऱ्याची नशिबाने मोठी कुचेष्टाच केली आहे. झालेल्या नुकसानीची हकीगत सांगताना वृद्ध शेतकऱ्याला रडू कोसळत होते.

**प्रशासनाकडून शेतकऱ्याची अवहेलना**

शिंगटे परिवार हा शिरूर कासार तालुक्यातील नारायणवाडी या गावचा रहिवासी आहे. तर गावापासून अगदी अर्धा किलोमीटर अंतरावर गेवराई तालुक्यातील जोडवाडी या गावच्या शिवारामध्ये गट नंबर १९९ मध्ये अडीच एकर जमीन आहे. तिथेच शेजारी शेतकऱ्यांसोबत पत्र्याचे शेड मारून राहत दांम्पत्य राहत आहे. शिरूर तालुक्यातील निमगाव मायंबा तलाठी सज्जाचे तलाठी महोदयांनी ही घटना माझ्या शिरूर तालुक्यातील नाही यामुळे माझ्या सज्जामध्ये येत नाही, म्हणत जाणीवपूर्वक पाठ फिरवली होती. अखेर शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे यांना याबद्दल माहिती दिल्यानंतर तलाठी महोदयांची पंचनाम्यासाठी सुमारे २४ तास वाट पहावी लागली. इकडे गेवराई तालुक्यातील तांदळा सज्जाचे पाखरे तलाठी यांच्याकडूनही वेळीच दखल घेण्यात आली नाही.

-------------

### आ.बांगर यांच्या घरावर

बांगर आणि भाजपचे आमदार तानाजी मुटकुळे आमनेसामने आले आहेत. भाजप आमदाराच्या दबावामुळेच संतोष बांगर यांच्या घराची झाडाझडती घेण्यात आल्याचा आरोप हेमंत पाटील यांनी केला. शिवसेनेचे विधानपरिषदेचे आमदार हेमंत पाटील म्हणाले की, ''जिल्ह्यात शिवसेनेची स्थिती आता चांगली आहे. कळमनुरी आणि हिंगोली शहरावर सेनेचा भगवा फडकणार आहे. परंतु विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकल्याचे दिसत आहे. संतोष बांगर यांच्या घरावर पहाटे पाच वाजता १०० पोलिसांनी धाड टाकून झाडाझडती घेतली. संतोष बांगर यांची ७५ वर्षांची आई आजारी असताना त्यांच्या घराची झाडाझडती घेऊन त्रास देणे ही अतिशय वाईट गोष्ट आहे. हेमंत पाटील पुढे म्हणाले की, ''आमदार असल्याने त्यांच्या घराची झाडाझडती करताना त्याची पूर्व परवानगी घ्यावी लागते. पण विधानसभा सभापतींकडून तसा कोणताही आदेश वा मेल आला नाही. मग ही धाड कुणाच्या सांगण्यावरुन टाकण्यात आली? सत्ताधारी आमदार मुटकुळेंच्या दबावाखाली ही कारवाई करण्यात आली आहे का?'' या प्रकरणाची गंभीर दखल एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. तसेच आम्ही दोन्ही जिल्ह्यातील आमदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेणार आहोत. राज्यात आम्ही सत्तेतील समान वाटेकरी आहोत. असं असतानाही स्थानिक आमदार पोलिसांवर दबाब टाकत आहेत, ते आम्ही मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहोत असं हेमंत पाटील म्हणाले. एखाद्या आमदाराच्या घराची झाडाझडती ही दहशतवादी किंवा गुंडाच्या घराची झाडाझडती केल्यासारखी घेण्यात आली. निवडणुका या काही काळापुरत्या आहेत, लोक आपल्याकडे बघत असतात असं सांगत हेमंत पाटील यांनी महायुतीतील मित्रपक्षावर टीका केली. दिरम्यान, संतोष बांगर हा हिंगोली जिल्ह्याला लागलेला कलंक असल्याचे म्हणत भाजपचे आमदार तानाजी मुटकुळे यांनी टीका केली. संतोष बांगर पैशांशिवाय राहू शकत नाही. त्यांचे अनेक अवैध धंदे असल्याचा आरोप तानाजी मुटकुळे यांनी केला. संतोष बांगर यांनी सत्तांतराच्या काळात ५० खोके घेतले ही सत्य गोष्ट असल्याचा दावा भाजप आमदार तानाजी मुटकुळेंनी केला आहे.

-----------

### सोशल मीडियावरील केटेंटरवर

वापरकर्त्याने तयार केलेल्या कंटेंटसाठी ही एक कमतरता आहे. भाषण स्वातंत्र्य हा एक अमूल्य अधिकार आहे; परंतु त्यामुळे विकृती होऊ शकत नाही. मूळत समस्या अशी आहे की, कोणीतरी सोशल मीडियावर स्वतःचे चॅनेल तयार करतो, मी कोणालाही जबाबदार नाही असे कसे होईल. कोणीतरी जबाबदार असले पाहिजे,'' असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी राष्ट्रविरोधी म्हणून पाहिले जाणाऱ्या कंटेंटचा मुद्दाही समोर आला. यावर न्यायमूर्ती जयमाल्य बागची म्हणाले की, आपल्याला खऱ्या अर्थाने सामना करावा लागत आहे ती म्हणजे प्रतिसाद वेळेचा. कोणी तरी प्रतिक्रिया देतील तेव्हा ते लाखो प्रेक्षकांपर्यंत व्हायरल होईल, मग तुम्ही ते कसे नियंत्रित कराल, असा सवालही त्यांनी केला.

-----------

cmyk

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५



## थोडक्यात

### एसडीएम, तहसिल व रजिस्ट्रार कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय आणि दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाला आहे. शेतकरी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला भगिनी आणि सामान्य जनतेची कामासाठी दलालांकडून लुट होत आहे. याला जबाबदार अधिकारीच आहेत.

दलालांच्या सुळसुळाटामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य जनतेची लुट होत आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी आहे .

**दलालांच्या सुळसुळाटाचे परिणाम**

– शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य जनतेची लुट होत आहे – सरकारी कामांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत – दलालांना वाढता प्रोत्साहन मिळत आहे

**कारवाईची मागणी**

– बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी

– दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी – शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य जनतेची सुरक्षा सुनिश्चित करण्यात यावी

### जि.प.चौसाळा शाळेत संविधान सन्मान प्रभात फेरीचे आयोजन

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जि प माध्यमिक शाळेत भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शाळेत संविधान अमृत महोत्सवा निमित्त भव्य संविधान सन्मान रॅली चे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख लक्ष्मण राऊत व वरिष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम भारताचे संविधान उद्देशिका व संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली त्यानंतर संविधान सन्मान रॅली शाळेच्या प्रांगणातून प्रस्थान होऊन चौसाळा परिसरातून अण्णाभाऊ साठे चौक ते पोस्ट ऑफिस मार्गे शाळेच्या प्रांगणात येऊन संपन्न झाली त्यानंतर शाळेतील बालगंधर्व सांस्कृतिक सभागृहात इयत्ता पहिली ते दहावी च्या विद्यार्थ्यांचे वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड तर प्रमुख पाहुणे म्हणून महारुद्र झोडगे,योगदान गांधले, श्रीमती शालिनी काकडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख लक्ष्मण राऊत व नववी अ वर्गा च्या विद्यार्थ्यांनी केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक कु. सृष्टी नागरगोजे या विद्यार्थिनीने केले त्या नंतर वकृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी संविधानाबद्दल आपले विचार मांडले तसेच शिक्षकांन मधून श्री ज्ञानेश्वर मस्के यांनी संविधानातील मूलभूत हक्क कर्तव्य आणि संपूर्ण संविधानाचे महत्त्व व माहिती विद्यार्थ्यांना सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी तोडकर व क्रांती दारवाडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन पायल नाईक या विद्यार्थिनीने मानले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



# अपघातातील मयत सुदे परिवाराला दहा लाखांची मदत

## मुलींचे पालकत्व ईश्वर मुंडेंनी स्विकारले

**दिंद्रुड प्रतिनिधी**

**पालखी महामार्गावरील धारूर तालुक्यातील कवडगाव पाटी जवळ शनिवार दि.२२ रोजी झालेल्या अपघातात कुसुम सुदे यांचे मंगळवारी (दि.२५) रोजी दुर्दैवी निधन झाले. या अपघातातील जखमी विष्णू सुदे यांच्यावर पुणे येथील रुबी हॉस्पिटलला उपचार सुरू असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्यावतीने मयत कुसुम सुदे यांच्या परिवाराला दहा लाख रुपयांची मदत गुरुवारी करण्यात आली.**



पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, पक्षाचे नेते ईश्वर मुंडे,ग्रा.पं.सदस्य महेश ठोंबरे, रामेश्वर मुंडे यांनी गुरुवारी सुदे कुटुंबाची दिंद्रुड येथे भेट घेत विष्णू दामोदर सुदे यांच्या बँक खात्यात दहा लाख रुपयांची रक्कम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने डीडी द्वारे जमा केल्याची माहिती दिली. विष्णू सुदे यांच्यावर शासनाच्या वतीने उपचाराचा सर्व खर्च करण्यात येत आहे. विष्णू यांची मुलगी रागिनी व अक्षरा यांच्या सर्व शिक्षणाची व लग्नाची जबाबदारी ईश्वर मुंडे यांनी स्वीकारत सुदे कुटुंबाला आधार दिला.

ना.अजीतदादा पवार यांनी बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना भ्रमणध्वनीवर संपर्क करत झालेली घटना खूप दुर्दैवी व मनाला वेदना देणारी आहे.या घटनेत विष्णू सुदे यांच्यावर उच्च प्रतिचे उपचार चालू असून त्यांची प्रकृती लवकर चांगली व्हावी या साठी ईश्वराला प्रार्थना करतो.परंतू या घटनेत आमची भगिनी सौ.कुसुमताई विष्णू सुदे यांचे उपचारादरम्यान दु:खद निधन झाले आहे.यामुळे मला व्यक्तिश: खूप दु:ख झालेले आहे.या घटनेमुळे सुदे व तुंबड(माहेरचे आडनाव) परिवाराला झालेल्या दु:खात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोबत असल्याच्या सद्भावना व्यक्त केल्या.

# पोलिसांच्या रक्तदान शिबिरात ५६ जणांचे रक्तदान

वडवणी । प्रतिनिधी

भारतीय संविधान दिन तसेच २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात पोलिस दलातील शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने काल दि.२६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबीरात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन हे शिबीर यशस्वी केले.

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात पोलिस दलातील शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, पोलिस उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व वडवणी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या संकल्पनेतून वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने काल दि.२६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत वडवणी पोलिस ठाण्याच्या समोरील प्रांगणात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील सामाजिक दायित्वाच्या भावनेतून पोलिस प्रशासनासह समाजातील सर्व घटकांनी व रक्तदात्यांनी रक्तदान करावे असे आवाहन वडवणी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी केले होते. त्यांच्या याच आवाहनाला वडवणीकरांनीही भरभरुन प्रतिसाद देत दिवसभरात या रक्तदान शिबीरातून तब्बल ५६ रक्तदात्यांनी आपले बहूमोल असे रक्तदान केले. यावेळी रक्तदान केलेल्या प्रत्येक रक्तदात्याला वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने एक प्रशस्तीपत्र व गुलाब पुष्प देवून त्यांचे आभार मानण्यात आले. तसेच रक्तदात्यांसाठी नाष्ट्याचीही व्यवस्था यावेळी करण्यात आली होती. आपल्या देशासाठी शेवटच्या रक्ताच्या थेंबापर्यंत लढणाऱ्या लढवय्यांच्या आठवणीत रक्ताच्या प्रत्येक थेंबातून एक छोटंसं योगदान देवून आपण दिलेले योगदान कोणासाठी तरी जिवदान ठरु शकते या समाजभावनेतून आपण केलेले रक्तदान निश्चितच अभिनंदनीय आहे, अशी प्रतिक्रिया याप्रसंगी सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी व्यक्त केली. शेवटी वडवणी पोलीस ठाण्याच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले. तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी वडवणी पोलिस ठाण्याच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.




**खाकीच्या सामाजिक दायित्वाचे सर्वत्र कौतुक**

# शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

## स्व. गोविंदराव वाघ यांच्या स्मृतिनिमित्त वृक्षारोपण व शहीदांना मानवंदना

बीड । प्रतिनिधी

बीड शहरालगत असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी.बी. चव्हाण हे होते. तर व्यासपीठावर ए.पी. वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संस्थेचे संस्थाचालक स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्या नंतर संविधान वाचन, संविधान चित्रांचे प्रदर्शन, प्रश्नमंजुषा आणि वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी संविधानाचे मूल्य, लोकशाहीची तत्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे केली. संविधान दिनाचे औचित्य साधून संस्थाचालक स्व. गोविंदराव वाघ यांच्या स्मृती प्रित्यार्थ शाळेच्या मैदानात चिकू झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर संविधान दिनानिमित्त शाळेत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. बक्षीस वितरणानंतर शाळेतील काही निवडक विद्यार्थ्यांनी स्व. गोविंदराव वाघ यांच्या बद्दल तसेच संविधानाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या मनोगता नंतर वाव्हळ सर यांनी स्व. गोविंदराव वाघ सर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान, दूरदृष्टी, तसेच कर्मचाऱ्यांबद्दल असणारी आपुलकी याबद्दल माहिती दिली. तसेच लोकशाही, मूलभूत अधिकार आणि संविधानिक मूल्यांवर सखोल मार्गदर्शन केले. त्या नंतर मुख्याध्यापक श्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे महत्त्व समजावून सांगितले व जबाबदार नागरिक होण्याचे आवाहन केले. याशिवाय २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी भावपूर्ण मानवंदना अर्पण केली. भारतीय संविधान प्रस्तावनेचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती साळुंके मॅडम यांनी केले. कार्यकम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वाहातूक शाखेच्या वतीने ट्रिपल सीट वाहनांवर कारवाई

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस वाहतूक शाखेच्या वतीने पाटोदा शहरात ठीक ठिकाणी असलेल्या चौकामध्ये अनाधिकृत ट्रिपल सीट वाहनांवर व वाहनांना नसलेल्या नंबर प्लेट नसलेल्या वाहनावर आज दंडात्मक कारवाई करण्याचा आली या मोहिमेत वाहतूक शाखेचे पोलीस हवलदार तांदळे साहेब पीएसआय खेडकर पाटोदा पोलीस स्टेशनचे चार आमदार यांनी विशेष मोहीम राबवली असून यामुळे अनाधिकृत वाहतूक करणारे वाहन चालकांमध्ये यामध्ये काही राजकारणी हस्तक हे पोलिसांवर राजकीय दबाव आणत असल्याने संबंधित कर्मचाऱ्यावर तणावळीत असल्याचे बोलले जातात आहे.

पाटोदा शहरात सध्या मोटरसायकल फर्माईश वाल्याची आते ताई वाढलेली असून याचा त्रास महाविद्यालयीन विद्यार्थिनी व सामान्य नागरिकांना होत असून रस्त्याने चालताना जोरात हॉर्न वाजवणे तसेच आलेल्या वाहनांना कट मारून आपली एटीट्यूड दाखवणे यामुळे शहरातील वाहतूक यंत्रणा कोड मोडलेली असून या बेशिस्त वाहतूक आणि वाहन चालकाच्या विरोधात पाटोदा पोलीस स्टेशन अंतर्गत वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबवलेले असून शहरातील प्रत्येक चौकात बेशिस्त द्विचालकावर कार्यवाही करण्यात येत असून यामुळे शहरात देशिस्त वाहकावर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

# भारताचे संविधान जगात आदर्श -पो.नि. सुर्यतळ

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात संविधान दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

शेजारील राष्ट्रात सत्तेविरुद्ध बंड होऊन त्यादेशात अस्तिरात निर्माण झाली परंतु भारतात विविध जाती, धर्म ,संस्कृती असताना संविधानामुळे भारत एकसंघ आहे. त्यामुळे जगात सर्वात मोठे लोकशाही असलेल्या भारताचे संविधान आदर्शवत आहे असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतल यांनी संविधान दिनानिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात बोलताना व्यक्त केले.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिना निमित्त व्याख्यान व संविधान एकता रॅली चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.के.सानप तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ होते यावेळी रेड रिबन क्लब प्रमुख शेख शहाबुद्दीन समुपदेशक ,डॉ. एन.के .मुळे,डॉ.एम. ए.कव्हळे,प्रा. पवनकुमार शिंदे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.एम.के. अलझेंडे,प्रा. स्वप्नील टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण,अधीक्षक केशव भोंडवे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व संविधान उद्धेशिकेचे वाचन प्रा.संजय बागुल यांनी केले.सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे यांनी केले तर आभार प्रा.उमेश राठोड यांनी केले . कार्यक्रमाला प्राध्यापक, विध्यार्थी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.


# फ्लाईंग बड्र्स अकॅडमीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

### विद्यार्थ्यांच्या कला अविष्काराने प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध

माजलगाव । प्रतिनिधी

येथील फ्लाइंग बड्र्स अकॅडमीचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच उत्साहात संपन्न झाले दोन दिवसीय भव्य स्नेह संमेलनात नर्सरी ते नववी इयत्तेतील विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कला गुणांना वाव देत अनेक कला प्रकार सादर केले छोट्या छोट्या विद्यार्थ्यांनी लोककला नृत्यांचे अनेक प्रकार सादर करत काही ऐतिहासिक प्रसंग अगदी हुबेहूब सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.विविध कलाप्रकार व विद्यार्थ्यांचे प्रभावी सादरीकरण आणि मान्यवरांची उपस्थिती यामुळे हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आणि अध्यक्षस्थान दोन स्वतंत्र दिवशी मान्यवरांनी भूषवले.पहिल्या दिवशी बालग्राम सहारा अनाथालय चे संतोष गर्जे व प्रमुख अतिथी तुषार डोडिया पालक समुपदेशक यांची प्रमुख उपस्थिती होती तर दुसऱ्या दिवशी डॉ. प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ.राधाकिशन डाके व गणेश मैड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



त्याच बरोबर पोलीस अधिकारी, डॉक्टर,आणि मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला पी.आय.राहुल सूर्यतळ, पी.एस. आय.माकणे, शहर पोलीस स्टेशनचे साह्यक पोलीस निरीक्षक मुंडे यांच्यासह मेघराज पिंगळे,सौ. विजयश्री दराडे,श्रीमंत सानप,नजीर पठाण यांसारखे प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक आणि संचालक जगदीश चांडक यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत कार्यक्रमा दरम्यान, शैक्षणिक,क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.सारिका बजाज यांनी उत्कृष्ट नियोजन केले. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी शीतल काकडे,प्रदिका परमेकर,ममता शिंगाडे व सुदेप पाणी यांनी सांभाळली. उपमुख्याध्यापक सचिन गायकवाड आणि ज्योती बनसोडे मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.स्नेह संमेलनात दोन्हीही दिवशी पालक आणि प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## पान ६ वरुन...

### भारतीय काँग्रेस पक्षाचा

विचारधारेच्या कार्यकर्ते आणि मतदारांनी नोद घेऊन काँग्रेस पक्षाच्या स्थानिक उमेदवार प्रभाग क्र २ कासार पपीता भिवसेन, प्रभाग क्र ६ शेख हुजायफा,प्रभाग १० सीमा तांबोळी,प्रभाग क्र ११ शेख रशीद प्रभाग,१२ सौ. सुलोचना प्रधान,प्रभाग १३ पुष्पा गवळी या काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार यांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचं आवाहन तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी सदरील प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### धोंडीराम जाधव यांची

अध्यक्ष धोंडीराम जाधव यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष हा स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार करत नसल्याच्या कारणावरून किंवा कार्यकर्त्यांना निवडणुकीत सहभाग घ्यायची इच्छा असताना देखील वरिष्ठ पातळीवर याची कसलीही दखल न घेता किंवा सामान्य कार्यकर्त्याचा कसलाही विचार न करता वरिष्ठ पातळीवरून इतर पक्षाची आघाडी केल्यामुळे सर्व सामान्य कार्यकर्त्यांना निवडणुकीपासून वंचित राहावे लागते या कारणामुळे मनसे तालुका अध्यक्ष धोंडीराम जाधव यांनी पक्षाला सोडचिट्टी दिली असून त्यांनी शिवसेनेचे धनुष्यबाण हाती घेतले आहे. त्यांच्या या निर्णयाचे माजलगाव शिवसेनेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.

### प्रलंबित अनुदान, बिबट्याचा

शेतकऱ्यांचे प्रलंबीत अनुदान तात्काळ वितरीत करा.

पुरग्रस्तांची तातडीची मदत प्रलंबीत आहे तसेच घरांचे पडझडीची रक्कम तातडीने वितरीत करावी. महापुरात खरडून गेलेल्या जमीनींचे अनुदान देऊन नरेगातून सर्वेक्षण करुन मोजमाप करुन मस्टर काढावे या व इतर मागण्यांची पूर्तता दोन दिवसांमध्ये करण्यात यावी नसता शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता अहिल्या नगर – बीड राज्य मार्गावर पिंपरी घाटा चौकात शेतकरी व ग्रामस्थांसह रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाव्दारे दिला आहे. निवेदनावर अंकुश तळेकर, पोपट शेकडे, दिलीप तांदळे, बबन खाडे, नवनाथ तांदळे,पोपट तळेकर,शाहुराज झांजे व इतरांच्या स्वाक्षरी आहेत. निवेदनाच्या प्रती माहितीसाठी सहाय्यक अभियंता विद्युत महावितरण कंपनी आष्टी, वनपरिक्षेत्र अधिकारी आष्टी,गटविकास अधिकारी आष्टी, सहाय्यक पोलीस निरीक्षक आंभोरा यांना पाठवल्या आहेत.

### आ.सुरेश धस यांनी

मंगळवारी आ.धस यांनी महावितरण कार्यालयात जाऊन बैठक घेत सध्याच्या काळात पिकांना आवश्यक पाणीपुरवठा होण्यात मोठा अडथळा निर्माण होत असून अनेक ठिकाणी शेतकरी ट्रान्सफॉर्मरची मागणी करत असून याबाबत मी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून अधिकचे ट्रान्सफॉर्मर या आठवड्यात उपलब्ध कसे होतील यावर मी लक्ष देऊन असल्याचे सांगत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जळालेले किंवा क्षमतेअभावी बंद पडलेले ट्रान्सफॉर्मर याची माहिती आपल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून २ दिवसात मिळवावी आणि त्या ठिकाणी आवश्यक तो पूर्ण क्षमतेने दिवसा वीजपुरवठा देण्यावर भर द्यावा अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.तसेच जिथे दुरुस्तीचे काम अनावश्यकपणे दिवसन्दिवस लांबू न देता

शेतकऱ्यांना वेळेवर आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने स्टाफ व साहित्य उपलब्ध करण्यावर भर देण्याचा सूचना देखील केल्या गत वर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने पाणी मुबलक प्रमाणात आहे त्यामुळे शेतकरी वर्गाला आपल्या धाना करीता मोठ्या प्रमाणावर पाणी साठा आहे आता प्रश्न हा लाईट संदर्भात भेडसावत होता हेच लक्षात घेऊन आज लोकनेते सुरेश आण्णा धस यांनी ही तातडीची बैठक घेतली .यावेळी त्यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,उपनगराध्यक्ष शैलेश येतसहस्रबुद्धे,नगरसेवक शरीफ शेख,भाऊसाहेब निंबाळकर महावितरणचे शिवा मार्कंडे, पी ए दता हुले,इम्रान तांबोळी,आदी उपस्थित होते.

### रिपाइंकडून राष्ट्रवादीच्या

अजित पवारांनी नुकत्याच झालेल्या सभेत स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार दिल्याचा दावा करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.जोगदंड म्हणाले, लाचखोरीत पकडलेल्या व्यक्तीला स्वच्छ प्रतिमा म्हणणे ही जनतेची थेट फसवणूक आहे. गुन्हे सुरु असतानाही प्रेमलता पारवे यांनी, प्रेस घेवून निर्दोष असल्याचे वक्तव्य करणे अत्यंत हास्यास्पद आहे. कायद्याचा अवमान होऊ नये म्हणून योग्य कारवाई व्हावी. याशिवाय त्यांनी आरोप केला की, राष्ट्रवादी गटातील उमेदवारी प्रक्रियेत भूमाफिया, वाळूमाफिया आणि गुटखा माफिया यांचा प्रभाव वाढला आहे. प्रेमलता पारवे यांच्या माध्यमातून या सर्वांना मिळून वक्फ बोर्डाच्या जमिनी नावे करून घ्यायच्या होत्या. तसेच अन्य जमिनी देखील हडप करण्याचा डाव या लोकांचा होता. असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

cmyk

# ...तर २०२० मधील आंदोलनाची पुनरावृत्ती होईल

## वीज, बियाणे विधेयकांविरोधात पंजाबमधील शेतकऱ्यांचा इशारा

चंदिगढ / वृत्तसंस्था

केंद्राने प्रस्तावित वीज (सुधारणा) विधेयक, २०२५ मागे घ्यावे, अन्यथा २०२०-२०२१ मध्ये झालेल्या आंदोलनाची पुनरावृत्ती होईल, असा इशारा संयुक्त किसान मोर्चाशी जोडलेल्या ५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी बुधवारी दिला. हे विधेयक येत्या संसदीय अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे. त्याविरोधात आता शेतकरी एकवटले आहेत.

शेतकऱ्यांनी भविष्यातील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी २८ नोव्हेंबर रोजी एसकेएमशी संलग्न असलेल्या संघटनांची बैठक बोलावली आहे. त्यांनी प्रस्तावित बियाणे विधेयक आणि चार कामगार कायदे मागे घेण्याची मागणी केली आहे. केंद्र सरकारची ही कृती म्हणजे अधिक केंद्रीकरणाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० देखील मागे घेण्याची मागणी केली आहे. भारतीय किसान युनियन (राजेवाल) चे अध्यक्ष बलबीर सिंग राजेवाल यांनी, शेतकऱ्यांना त्यांच्या बॅगा, अन्नधान्य आणि कपडे घेऊन आणखी एका बेमुदत आंदोलनासाठी तयार राहण्याची सूचना केली आहे. नवीन एका



लढ्यासाठी तयार राहा आणि यावेळी ते अधिक तीव्र असेल, असे ते म्हणाले. बीकेयू (एकता-उगराहां) चे अध्यक्ष जोगिंदर सिंग उगराहां यांनी म्हटले आहे की, वीज (सुधारणा) विधेयकाच्या माध्यमातून कॉर्पोरेट क्षेत्राच्या हातात वीज वितरणाचे नियंत्रण दिले जाणार आहे. खासगीकरणाचा एक भाग म्हणून स्मार्ट चिप मीटर हा पुढे जाण्याचा एक संकेत आहे. त्याचप्रमाणे, बियाणे विधेयकामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बियाणांना, अगदी वादग्रस्त संकरित वाणांसह कृषी क्षेत्रावर नियंत्रण मिळवण्याची मुभा दिली जाऊ शकते. भारतीय किसान युनियन (एकता-डकौंदा) चे राज्य अध्यक्ष बुटा सिंग बुर्जगिल म्हणाले, ''सतर्क राहा बंधूंनो! शेतकऱ्यांना अशा टप्प्यावर ढकलले जात आहे; जिथून परतणे अशक्य आहे.क्रांतिकारी किसान युनियनचे अध्यक्ष दर्शन पाल सिंग यांनी म्हटले आहे, ''मागील आंदोलनाच्या जेव्हा सांगता झाली; तेव्हा दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सरकारने आमच्या शेतपिकांना किमान आधारभूत किंमतही दिलेली नाही. हे एकूण उत्पादन खर्चाच्या सुमारे ५० टक्के नफ्याएवढे होते. अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या पीक आणि पशुधनाच्या नुकसानीची भरपाई देण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले होते. हे आश्वासन खोटे ठरले.'' बीकेयू (डकौंदा) चे गुरबीर सिंग रामपूर यांनी सांगितले की, उत्तर प्रदेशमधील लखीमपूर खेरी हिंसाचाराशी संबंधित शेतकऱ्यांवर दाखल केलेले खटले रद्द केले पाहिजेत. पीक अवशेष जाळल्याबद्दल शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदीतील रेड एन्ट्री हटवायला हव्यात. शेतकऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भातील मसुदा ठरावाला एकमताने मंजुरी दिली आहे. त्यांनी म्हटले की, विविध देशांसोबत होणाऱ्या मुक्त व्यापार करारांच्या कक्षेतून शेती क्षेत्राला वगळले पाहिजे. केंद्राने कामगारविरोधी विधेयके रद्द करावेत. राज्य सरकारने पंजाब कृषी विद्यापीठ आणि पंजाब राज्य वीज मंडळाची जमीन विकण्याचा प्रयत्न थांबवावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# आंबा मोहर बाहेर पडण्यासाठी वातावरण अनुकूल



पैठण : सद्यःस्थितीतील वातावरणीय बदल आंबा काडीतून मोठ्या प्रमाणावर मोहर बाहेर पडण्यासाठी अतिशय अनुकूल, असल्याचे प्रतिपादन केसर आंबा गुणवत्ता केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ संजय पाटील यांनी केले. केसर आंबा गुणवत्ता केंद्रातर्फे इसारवाडी (ता. पैठण) येथे मंगळवारी (ता. २५) आयोजित प्रक्षेत्र भेटी दरम्यान ते बोलत होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे, आंबा बागायतदार शेख रसूल, राजीव सोनवणे, संजय पाटील,सुधाकर घुगे आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. पाटील म्हणाले, की थंडीची चाहूल बऱ्यापैकी दिसून येत आहे. कमी तापमान फळपिकांचा मोहर बाहेर पडण्यासाठी मदत करीत असते. आंबा काडीच्या टोकाचा भाग फुगीर बनलेला दिसत आहे. काही ठिकाणी मोहराची फुले बाहेर पडताना दिसत आहेत. या फुलांची फळे बाजरीच्या आकाराची झाल्यानंतर बागेस पाण्याची व्यवस्था केल्यास फायदेशीर ठरते. यावेळी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देण्यात आलीत.

# काळ्या गव्हाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी गहू संशोधन केंद्राचा महत्वाचा इशारा

मधुमेहासाठी उपयुक्त तेसच खाण्यासाठी पौष्टिक म्हणून काळया गव्हाला बाजारात चांगली मागणी आहे. काळ्या गव्हाची लागवड राजस्थान, पंजाब,हरियाणा,हिमाचल प्रदेश येथे मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र, महाराष्ट्रातील शेतकरीदेखील काळ्या गव्हाच्या शेतीकडे वळत आहेत. त्यामुळे बरेच शेतकरी देखील गेल्या गव्हाची लागवड करताना दिसून येत आहेत. मात्र तुम्ही सुद्धा काळ्या गव्हाची लागवड करण्याचा विचार करीत असाल तर ही बातमी महत्वाची आहे. काळ्या गव्हाच्या गावाच्या नावाखाली शेतकर्यांची दिशाभूल होत असल्याचे समोर आले आहे. बियाणे कायद्यात त्या वाणाची नोंदच नाही. महाराष्ट्रात काळया गव्हाच्या लागवडीची शिफारस पण नसल्याचे समोर आले आहे.

भारतीय गहू संशोधन केंद्रामध्ये गव्हाचे एकूण २२ वाण नोंद करण्यात आले आहेत. १९६५ च्या बियाणे कायद्याच्या राजपत्र अधिसूचनेनुसार वाणाची नोंद होणे महत्त्वाचे आहे. केंद्राने




केलेल्या मूल्यांकन निकषात काळा गहू हा वाण सरस ठरलेला नाही, अशी माहिती गहू संशोधन केंद्र, कुंदेवाडीचे अधीक्षक सुरेश दोडके यांनी दिली. काळ्या गव्हाची उत्पादकता इतर वाणांच्या तुलनेत कमी आहे. इतर गहू वाणांच्या तुलनेत प्रथिने, लोह, जस्त यांची उपलब्धता अधिक आहे. इतर वाणांच्या तुलनेत रोगप्रतिकारक नाही. उत्पादनपश्चात विक्रीकरीता अडचणींना सामोरं जावं लागू शकतं, असं गहू संशोधन केंद्राकडून जाहीर करण्यात आले आहे. अव्वाच्या सव्वा दराने काळ्या गव्हाचे बियाणे विक्रीचा काळाबाजार सुरू आहे. तर काही शेतकरी अधिक दराच्या लोभात काळ्या गव्हाची लागवड करत असल्याचे समोर आले आहे. मात्र, भारतीय गहू संशोधन संस्थेत गहू पिकाचे २२ वाण नोंदणीकृत आहेत. नोंदणीकृत २२ गहू वाणांच्या तुलनेत काळ्या गव्हात पोषकतत्वे ,रोगप्रतिकारकता व उत्पादकता कमी दिसून आले आहे. काळ्या गव्हाच्या वाणासंबंधी राष्ट्रीय स्तरावरून शिफारस नसताना लागवडी केल्या जात असल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. निफाड तालुक्यातील कुंदेवाडी येथील गहू संशोधन केंद्राकडे शहानिशा केली असता त्यांनी काळ्या गव्हाबद्दल माहिती दिली.

# हिवाळ्यात शेळ्या-मेंढ्यात होणारे आजार व घ्यावयाची काळजी

शेळी-मेंढीपालन व्यवसायामध्ये जसे संगोपन व व्यवस्थापन याला महत्व आहे. तसेच शेळ्यांचे आरोग्य सुध्दा तितकेच महत्वाचे आहे. जेथे शेळी-मेंढीपालन हा एक व्यवसाय म्हणून मोठ्या प्रमाणात केले जातो, तेथे कळपातील जनावरांना वेगवेगळ्या ऋतूत साथीच्या व इतर रोगांची लागण होऊन शेळ्या-मेंढ्यांच्या मृत्यूमुळे फार मोठे आर्थिक नुकसान होवू शकते. शेळी-मेंढीपालन व्यवसायिकांना शेळ्या-मेंढ्यांना होणारे रोग, त्याची लक्षणे तसेच उपचार व प्रतिबंधात्मक उपाय माहित असल्यास मरतुकीवर नियंत्रण ठेवता येईल व मिळणाऱ्या उत्पन्नात चांगली वाढ होईल. हिवाळ्यामध्ये शेळ्या-मेंढ्यांना प्रामुख्याने आंत्र विषरक्तता, संसर्गजन्य न्यूमोनिया, मवा फुट रॉट, सांसर्गिक गर्भपात, बाह्यकृमी, करडांची हगवण, इन्फेक्शस केरॅटायटीस (पिंक आय) असे विविध प्रकारचे आजार होतात.

आंत्र विषरक्तता : या रोगास एन्ट्रोटॉक्सीमिया व काही ठिकाणी भूल देखील म्हणतात. हा आजार विषाणूमुळे होतो. अचानक खाण्यात होणाऱ्या बदलामुळे किंवा तणावामुळे हा रोग उद्भवतो. लक्षणे - शेळीचे पोट दुखते यामुळे शेळी वारंवार उट-बस करते. क्वचितप्रसंगी जमिनीवर कोलांट्यादेखील मारते. पोटावर लाथ झाडते. पाटीचा कणा धनुष्याकृती होतो व कधी कधी हगवण देखील सुरू होते. या आजाराची रोगबाधा ही प्रमुख तीन ठळक स्वरूपात आळळून येते. सामान्यतः करडात आढळून येते. रोगाचा कालावधी हा २४ तासापेक्षा देखील कमी असतो आणि पुष्कळदा लक्षात देखील येत नाही व ते दगावते. दिर्घकालीन बाधा वारंवार कळपातील शेळ्या-मेंढ्या आजारी पडताना आढळतात. साधारणतः प्रौढ शेळ्या बळी पडतात. आजारी शेळ्या मलून मरणासन्न दिसतात. हगवण वारंवार होत असल्याने शेळ्या-मेंढ्यांच्या वजनात घट होते. हा आजार टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे रोगप्रतिबंधक उपाय व काळजी घेतली पाहिजे. करडू ४ ते ६ आठवड्याचे झाल्यावर लसीची पहिली मात्रा टोचून घ्यावी. बुस्टर लस १५ दिवसांनी लावावी व त्यानंतर ६ महिन्यांनी लसीकरण आवश्य करून घ्यावे. कळपात रोगबाधेची नोंद झाली असल्यास लसीकरण दर ४ महिन्यांनी करून घ्यावे.



फार्मवर नवीन शेळ्या आढळल्यास त्यांना विनाविलंब लसीकरण करून घ्यावे. त्यानंतरच शेळ्या कळपात सोडाव्यात. शक्यतो लसीकरण कार्यक्रम असा आयाजित करावा की शेळ्या-मेंढ्या विण्यापूर्वी २ ते ३ आठवडे लस टोचणीची वेळ राहील, जेणेकरून नवजात पिल्ल्यांना आईकडून रोगप्रतिकारशक्ती प्राप्त होईल. शेळ्या-मेंढ्यात होणारा दुसरा महत्वाचा आजार म्हणजे मवा होय. हा एक विषाणूमुळे होणारा सांसर्गिक रोग आहे. रोगाचा प्रसार शेळ्या-मेंढ्यांच्या कळपात अतिशय झपाट्याने होत असतो. रोगप्रसारात पिडीत जनावरांचा संपर्क अथवा प्रक्षेत्रावरील अवजारे मदत करतात. या रोगाची विशिष्ट लक्षणे म्हणजे शेळ्या-मेंढ्यांच्या त्वचेवर पिटिका आणि पुटिका आढळतात. क्वचितप्रसंगी नाकपुड्या व डोळ्यात देखील दिसतात. त्यानंतर याचे रूपांतर पुटिकांत होते व त्यावर जाड खपली धरली जाते. आजारी कोकरांना दूध ओढता येत नाही व चारा देखील खाता येत नाही. खाता न आल्याने अशी कोकरे व शेळ्या-मेंढ्या झपाट्याने कमजोर होतात व वजनात घट होते. हा आजार झाल्यास लागण झालेल्या शेळ्या-मेंढ्या तात्काळ कळपातून वेगळ्या कराव्यात व इतर आजारी जनावरांचा उपचार सुरू करावा, जेणेकरून कळपातील इतर निरोगी शेळ्या-मेंढ्यांना या रोगाची लागण होणार नाही.

संसर्गजन्य न्यूमोनिया : रोगाचा प्रादुर्भाव कोणत्याही ऋतूत आढळत असला तरी हवामान थंड झाल्यावर रोगाचे प्रमाण वाढलेले आढळते.

लक्षणे - रोगपिडीत शेळी मलून दिसते. शारीरिक तापमान वाढलेले असते. श्वास घेण्यास त्रास होतो आणि शारीरिक वजन घटल्यास नाकाव्दारे सतत विसर्ग वाहतो. जनावर वरचेवर खोकते आणि झपाट्याने कमजोर होत जाते. हा आजार शेळ्या-मेंढ्यांना झाल्यास आजारी जनावरांना कळपातून वेगळे करावे व तज्ज्ञपशुवैद्यकाकडून औषधोपचार करून घ्यावा. सांसर्गिक गर्भपात कमी करण्याकरीता शेळ्या-मेंढ्यांच्या कळपासाठी पुरेशी जागा असायला हवी. कळपाचे विभाजन करून ठेवल्यास हिवाळ्यामध्ये हे आजार कमी प्रमाणात पसरतात. शक्यतो दुषित खाद्य, पाणी आणि चारा शेळ्या-मेंढ्यांना देणे टाळावे.

इन्फेक्शस केरॅटायटीस (पिंक आय) : यालाच डोळे येणे असेही म्हणतात. जिवाणूमुळे हा आजार होतो. रोगाचा पूर्वकाळ सामान्यतः २ ते ३ दिवसांचा असतो. डोळे लाल होणे, डोळ्यातून पाणी वाहणे, उन्हात डोळ्यांना त्रास होतो म्हणून जनावरे डोळे बंद ठेवतात. शारीरिक तापमानात सौम्य प्रमाणात वाढ होते. एक ते दोन दिवसात डोळ्याच्या मध्यभागी पांढरा पडदा दिसू लागतो. डोळ्याचा पांढरापणा वाढत जाऊन एक किंवा दोनही डोळे पांढरे होतात. काहीवेळा डोळा फुटून जातो व अंधत्व येते. परंतू २ ते ३ आठवड्यात दृष्टी पूर्ववत होते. आजार कमी करण्यासाठी लागण झालेल्या शेळ्या-मेंढ्यांना तात्काळ वेगळे करावे व पुशुवैद्यकांच्या साहाय्याने उपचार सुरू करावेत.

करड्यांची हगवण : प्रक्षेत्रावरील करडात आढळून येणारा हा सामान्य आजार असून त्याची प्रमुख लक्षणे म्हणजे अतिसार आणि जंतूरक्तता ही होत. करडांचे मृत्यु होत असल्याने रोगाचे आर्थिक महत्व खूप आहे. अणूजिवांचे उगमस्थान म्हणजे पिडीत जनावरांची विष्ठा तसेच करडांना अणूजिवांचा संसर्ग हा गादी म्हणून टाकलेले गवत दुषित होऊन होतो. दुधाची भांडी अस्वच्छ असणे, कळपातील रोगपिडीत करडे, शेळ्यांची कास व बाह्य भाग चाटल्याने हा संसर्ग संभवतो. या आजाराच्या लक्षणात प्रामुख्याने पहिल्या ४ दिवसात सामान्यतः जंतूरक्तता अतिसार आढळून येत असतो. बाधा तीव्र स्वरूपाची असते व अतिसार २४ ते ९६ तास टिकतो. पिडीत करडू मलूल व अशक्त भासते. सुरूवातीस शारीरिक तापमान वाढलेले असले तरी करडू मरणासन्न झाल्यावर शारीरिक तापमान असाधारण होते. काही करडांत अतिसार किंवा रक्तमिश्रीत हगवण दिसते. रोगमुक्त करडात जंतूचे स्थानिकरण सांध्यात होते आणि यामुळे गुडघे सुजतात. करडांना चालता येत नाही व त्यातच त्यांचा मृत्यू ओढवतो.

रोगप्रतिबंधक उपाय : रोगबाधेची कारणे शोधत न बसता कळपात हगवण आढळल्याबरोबर पिडीत करडू तात्काळ वेगळे काढावे व तज्ज्ञ पशुवैद्यकाकडून उपचार सुरू करावेत. शक्य असल्यास संपर्कात असलेली पिल्ले कळपातून वेगळी करून स्वच्छ ठिकाणी स्थानांतरीत केल्यास हगवणीचा त्रास असणाऱ्या कळपाचे बेड निर्जंतुक करता येतील. बंदिस्त पध्दतीने ठेवलेल्या करडात रोगबाधेचा प्रादुर्भाव जास्त आढळतो. पिल्लांचा जन्म स्वच्छ जागेवर व्हावा, नवजात पिल्ले थंड पडणार नाहीत याकडे लक्ष पुरवावे. पिल्ले जन्मताच ६ तासांच्या आत त्यांना आईचा चीक पिण्यास मिळणे आवश्यक आहे. पिल्लांचे सारख्या वयाचे गट पाडावेत. गादी म्हणून पसरविलेले गवत स्वच्छ आणि कोरडे असावे. दुध काढण्याची भांडी, दुध पाजण्याची भांडी दरवेळेस स्वच्छ व निर्जंतुक असावीत. नवजात पिल्लांना गवत चघळू द्यावे आणि २ आठवड्यानंतर धान्यपदार्थ द्यावेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२० : पोर्तुगीज प्रवासी फर्डिनांड मॅगेलन याने प्रशांत महासागराला पार करण्याची सुरुवात केली होती.
१६१२ : गॅलिलिओ गॅलिली याने प्रथमच नेपच्यून या ग्रहाचा शोध लावला. मात्र तेव्हा त्याला तो तारा आहे.
१६६० : मध्ये लंडन ला रॉयल सोसायटीचे गठन झाले होते.
१८१४ : द टाइम्स ऑफ लंदन या वृत्तपत्राला पहिल्यांदा स्वयंचलित प्रिंटींग मशीन ने छापल्या गेले होते.
१८२१ : पनामा ने स्पेन पासून स्वतंत्र होण्याची घोषणा केली.
१८३६ : स्पेनने मेक्सिकोच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८८५ : मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
१८९३ : न्यूझीलंड मध्ये पहिल्यांदा महिलांनी मतदान केले होते.
१८९५ : ऑगस्टा व लुई या ल्युमियर बंधूंनी पॅरिस येथे चित्रपटाचा जगातील पहिला खेळ सादर केला. या खेळाचे तिकीट होते एक फ्रँक. पहिल्या खेळाचे उत्पन्न आले फक्त ३५ फ्रँक. मात्र नंतर तो खेळ एवढा लोकप्रिय झाला की आठवडाभरातच त्याचे दिवसाला २० खेळ होऊन दिवसाला २००० फ्रँक एवढे भरघोस उत्पन्न मिळू लागले. ल्युमिअर बंधू
१९३८ : प्रभात चा माझा मुलगा हा चित्रपट रिलीज झाला.
१९५६ : मध्ये याच दिवशी चीनचे प्रधानमंत्री चाऊ एन-ली भारताच्या दौर्यावर आले होते.
१९६४ : नासा चे मरीनर-४ हे अंतराळयान मंगळाच्या मोहिमेवर निघाले.
१९७५ : वेस्ट इंडीज चे प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू मायकेल होल्डिंग यांनी आजच्या दिवशी कसोटी सामन्यात डेब्यू केला होता. त्यांनी ६० कसोटी सामन्यात २४९ विकेट तर १०२ एकदिवसीय सामन्यात १४२ विकेट घेतल्या होत्या.
१९९० : मध्ये जॉन मेजर हे युनायटेड किंगडम चे प्रधानमंत्री बनले होते.
१९९६ : कप्तान इंद्राणी सिंग ऐरबेस ए-३०० विमानाला कमांड देणारी पहिली महिला ठरली.
१९९७ : भारताचे माजी प्रधानमंत्री आय.के.गुजराल यांनी राजीनामा दिला.
१९९९ : पाकिस्तान ला हरवून दक्षिण कोरियाने आशिया विश्वचषक आपल्या नावावर केला होता.
२००० : तेलगू भाषेतील महाकवी गुर्रम जाशुवा यांच्या नावाने दिला जाणारा साहित्य पुरस्कार कवी नारायण सुर्वे यांना जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५३ : डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला हेलन व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑक्टोबर १९४४)
१८५६ : वूड्रो विल्सन - अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ३ फेब्रुवारी १९२४)
१८५७ : स्पेनचा राजा अल्फान्सो (बारावा) यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १८८५)
१८७२ : गायक नट रामकृष्णबुवा वझे यांचा जन्म. (मृत्यू: ५ मे १९४३)
१८९९ : गजानन त्र्यंबक तथा ग. त्र्यं. माडखोलकर - कादंबरीकार, समीक्षक आणि पत्रकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९७६)
१९११ : फणी मुजुमदार - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक. दूरदर्शनवर लोकप्रिय झालेल्या 'रामायण' या मालिकेची पटकथा त्यांनी लिहिली होती. चित्रपटसृष्टीतील सहा दशकांच्या वाटचालीत त्यांनी केवळ हिन्दीतच नव्हे तर चिनी, बंगाली, मल्याळी, उडिया व इंग्रजी चित्रपटांच्या निर्मितीत मोठे नाव कमावले. (मृत्यू: १६ मे १९९४)
१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार (मृत्यू: १० ऑगस्ट १९४२)
१९२७ : प्रसिद्ध हाडांचे डॉक्टर प्रमोद करण सेठी यांचा जन्म.
१९३२ : धीरुभाई अंबानी - उद्योगपती (मृत्यू: ६ जुलै २००२)
१९३७ : रतन टाटा - उद्योगपती
१९४० : ए. के. अँटनी - भारताचे परराष्ट्रमंत्री अरुण जेटली केंद्रीय मंत्री व वकीलअरुण जेटली केंद्रीय मंत्री व वकील
१९४५ : वीरेंद्र - नेपाळचे राजे (मृत्यू: १ जून २००१)
१९४५ : हिंदी साहित्यकार तसेच पत्रकार अमर गोस्वामी यांचा जन्म.
१९५२ : अरुण जेटली - केंद्रीय मंत्री व वकील
१९६४ : भारतीय अमेरिकन वकील आणि राजकारणी मायकल बेनेट यांचा जन्म.
१९८७ : अर्जुन पुरस्काराने सन्मानित अभिलाषा म्हात्रे यांचा वाढदिवस.
१९८८ : भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री यामी गौतम यांचा वाढदिवस

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६३ : फ्रॅन्सेस्को मारिया ग्रिमाल्डी इटालियन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २ एप्रिल १६१८)
१८९० : महाराष्ट्राचेथोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचे निधन.
१८९३ : ब्रिटिश अधिकारी सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांचे निधन. (जन्म: २३ जानेवारी १८१४)
१९३१ : आबालाल रहमान - चित्रकार (जन्म: १८६०)
१९३९ : बास्केटबॉल चे निर्माते जेम्स नेस्मिथ यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १८६१)
१९५४ : भौतिक शास्त्राचे शास्त्रज्ञ एनरिको फर्मी यांचे निधन.
१९६२ : बंगाल चे दृष्टिहीन गायक के.सी.दे यांचे निधन.
१९७७ : सुमित्रानंदन पंत - छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी (जन्म: २० मे १९००)
१९९४ : चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांचे निधन.
१९८१ : हिन्दी चित्रपटांत चार दशके चरित्र अभिनेत्याच्या भूमिका करणारे डेविड अब्राहम चेऊलकर तथा डेविड यांचे कॅनडातील टोरांटो येथे निधन झाले.
१९८९ : हिंदी भाषेचे कादंबरीकार देवनारायण द्विवेदी यांचे निधन.
२००० : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे - तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २४ जानेवारी १९२४ वेंगुर्ला)
२००१ : नाटक निर्माते अनंत काणे यांचे निधन.
२००६ : प्रभाकर पंडित - संगीतकार व व्हायोलिनवादक (जन्म: ३० सप्टेंबर १९३३)
२००८ : भारतीय हवलदार गजेन्द्र सिंग यांचे निधन.
२००८ : भारतीय सैनिक संदीप उन्नीकृष्णन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १९७७)
२०१२ : अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १९२६).

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# सभापती राम शिंदे अन आमदार रोहित पवारांचा संघर्ष पेटणार

## कार्यकर्त्यावर होणार विशेषाधिकार भंगाची कारवाई

अहिल्यानगर ।

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधान परिषद सदस्यांविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी शरद पवार गटाचे कार्यकर्ते सूर्यकांत मोरे यांच्यावर विशेषाधिकार भंगाची कारवाई करावी, अशी औपचारिक मागणी भाजपाचे विधान परिषदेतील गटनेते आणि गृहनिर्माण स्वयं समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी केली आहे.

दरेकर यांनी सांगितले की, २३ नोव्हेंबर रोजी जामखेड नगरपरिषद निवडणूक प्रचार सभेत बोलताना मोरे यांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच सदस्यांविषयी अतिशय अवमानकारक आणि दिशाभूल करणारी भाषा वापरली. या वक्तव्यामुळे सभागृहाची प्रतिष्ठा धुळीला मिळाल्याचा आरोप त्यांनी केला. मोरे यांनी वरिष्ठ सभागृहाचा आणि प्रत्येक सदस्याचा





अपमान केला आहे. ही कृती स्पष्टपणे विशेषाधिकारभंग ठरते, असे दरेकर म्हणाले.दरेकर यांनी स्पष्ट केले की, संविधान कलम १९४ नुसार राज्य विधानमंडळ आणि सदस्यांना विशिष्ट विशेषाधिकार आहेत. सभागृहाच्या मानहानीस कारणीभूत ठरणारी कोणतीही कृती कामकाजावर परिणाम करत असल्यास ती विशेषाधिकारभंगात मोडते. त्यामुळे मोरे यांच्यावर कारवाई अनिवार्य असल्याचे त्यांनी सांगितले. मोरे यांचे वक्तव्य सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार हसत होते, असेही दरेकरांनी निदर्शनास आणले. शरद पवार, सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, शशिकांत शिंदे हे सर्व विधान परिषदेचे सदस्य किंवा माजी सदस्य राहिले असल्याचे सांगत, मोरे यांनी केलेली टिप्पणी या सर्वांनाही लागू होते का? असा सवाल दरेकरांनी उपस्थित केला. मविआ नेत्यांवर टीका करताना दरेकर म्हणाले, त्यांचा लोकांवरचा विश्वास उडाला आहे. मैदानात उतरून लढण्याची ना उमेद उरली आहे ना हिम्मत. महायुतीचा पारदर्शक कारभार पाहून त्यांना टीकाही करता येत नाही. भाजपावर लोकांचा विश्वास असल्यामुळे १०० ठिकाणी बिनविरोध निवड झाली आणि त्यांची पायाखालची जमीन सरकली आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे जामखेड ते विधान परिषदेसह राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# भाच्याच्या लग्नाला जाणाऱ्या मामावर काळाचा घाला

संभाजीनगर

भाचीच्या लग्नासाठी चाळीसगावकडे जात असलेल्या मामाचा झालेल्या अपघातात करुण अंत झाला. सदरची घटना छत्रपती संभाजीनगर ते पुणे महामार्गावर असेलेल्या जिकठाण फाट्यालगत ही घटना घडली. या घटनेत बाबुसिंग सोबकचंद मेहेर (४५, ह.मु.ढोरेगाव, मूळ रा. पेंढापूर, ता. गंगापूर) असे मृत दुचाकीस्वार मामाचे नाव आहे. तर त्यांची मुलगी जखमी झाली आहे.




याविषयी माहिती अशी की, बाबूसिंग सोबकचंद महेर हे दुचाकी (एमएच- २०, डीयू ०५४१) वर मुलगी आंचल हिला घेऊन ढोरेगाव येथून चाळीसगावकडे निघाले होते. त्यांची दुचाकी छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गावरील जिकठाण येथे येताच त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात मेहेर हे गंभीर जखमी झाले. तर मुलगी आंचल ही जखमी झाली. अपघाताची माहिती मिळताच ॲम्बुलन्स चालक शुभम वाघमारे यांनी घटनास्थळी धाव घेत मेहेर यांना गंगापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. तर जखमी आंचल हिच्यावर छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातात ठार झालेल्या बाबूसिंग मेहेर यांनी दुचाकीवर हेल्मेट घातलेले होते. मात्र अपघात एवढा भीषण होता की मेहेर यांचा जागेवरच मृत्यू झाला. या प्रकरणी वाळूज पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद घेतली आहे. दरम्यान या आकमित घटनेमुळे नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. जिकठाण फाट्यालगत विरुध्द दिशेने भरधाव वेगात आलेल्या टेम्पो चालकाने मेहेर यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. त्यात बाबूसिंग मेहेर हे ठार होऊन त्यांची मुलगी जखमी झाली. अपघातानंतर टेम्पोचालकाने घनास्थळावरून धूम ठोकली. असे काही प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. या अपघाताची चौकशी करून धडक देणाऱ्या वाहनचालकावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी येथून होत आहे.

## थोडक्यात

### वृद्ध महिलेचे दागिने लंपास

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर येथील तारकपूर बसस्थानक परिसरातून पाथर्डी येथील ७० वर्षीय वृद्ध महिलेचे दागिने चोरीला गेल्याची घटना मंगळवार, दि. २५ रोजी घडली. श्रीरापूरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना प्रवाशांची मोठी गर्दी होती. या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेची पर्स उघडणी केली.बसमध्ये चढल्यानंतर महिलेने आपली पर्स तपासली असता, पाकीट दिसले नाही आणि पर्सची चेन उघडलेली आढळली. पाकीटात त्यांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम गायब झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वृद्ध महिलेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

### झेंडीगेट परिसरात छापा; ११०० किलो गोमांस जप्त

अहिल्यानगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या गोवंशाच्या मांसाची कत्तल आणि विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने ताब्यात घेतले. छाप्यात सुमारे ११५० किलो वजनाचे गोमांस जप्त केले. नईम कादिर कुरेशी (वय ३५ वर्ष, रा. बाबा बंगाली, झेंडीगेट, अहिल्यानगर) असे आरोपीचे नाव आहे.पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक झेंडीगेट परिसरात गस्त घालत होते. दरम्यान, २२ नंबर मशीद समोरील एका पत्र्याच्या खोलीत बेकायदेशीरपणे गोमांस विक्री करत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पथकाने छापा टाकला. घटनास्थळी वरील आरोपी गोमांस विक्री करताना आढळून आला. पथकाने ११०० किलो गोमांस, एक धारदार सत्तूर आणि एक सुरा असा एकूण २ लाख ३० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. पोलीसांनी या प्रकरणी भारतीय दंडसंहिता कलम २७१, २२३ आणि महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९९५ चे कलम ५ (ब), ९ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# तत्कालीन चार सहाय्यक आयुक्तांसह सात जणांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

माहिती अधिकार कायद्याचा वापर करून शिष्यवृत्तीच्या कागदपत्रांची माहिती मागवणार्या एका सेवानिवृत्त अधिकार्याने येथील समाज कल्याण विभागातील तत्कालीन चार सहाय्यक आयुक्त आणि तीन लिपीकांवर आरोप करणारी फिर्याद तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या उत्पन्न दाखल्याचा तपशील असलेली महत्त्वाची कागदपत्रे जाणूनबुजून नष्ट केल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे.

क्लिअरींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (आरबीआय) पुणे येथे माहिती तंत्रज्ञान विभागात कार्यकारी अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेले रोहित शिवाजी कदम (रा. सुवर्णनगर, कराड रस्ता, पंढरपूर, जि. सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. सन २००६ ते २०१० दरम्यान येथील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाचे तात्कालीन सहाय्यक आयुक्त आर. एम. मुन्शी, प्र. सहाय्यक आयुक्त आर. के. मोरे, सहाय्यक आयुक्त रतन बनसोडे, सहाय्यक आयुक्त पी. सी. चव्हाण, शिष्यवृत्ती विभागामधील कनिष्ठ लिपीक दयानंद जगताप, वरिष्ठ लिपीक सुरेश राजाराम काजवे, कनिष्ठ लिपीक विलास ज्ञानदेव मोरे यांच्याविरूध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ चे कलम ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कदम यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी माहिती अधिकारात अहिल्यानगर येथील समाज कल्याण विभागाकडे विशिष्ट विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांसोबतचे उत्पन्न दाखले आणि इतर कागदपत्रांची सत्यप्रत मागितली होती. मात्र, त्यांना वारंवार अर्धवट आणि चुकीची माहिती देण्यात आली. यावर प्रथम अपील दाखल केल्यानंतर, प्रादेशिक उपआयुक्त (नाशिक) यांनी कदम यांना १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर यांना दिले होते. या निर्णयानुसार दिलेली माहिती तपासल्यावर, कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर सोनई (ता. नेवासा) येथील शैक्षणिक वर्ष २००६-०७ ते २००९-१० या कालावधीतील प्रपत्र अ (स्टेटमेंट ए) मधील विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या उत्पन्न दाखल्यांचा तपशील मोठ्या प्रमाणात नष्ट केल्याचे कदम यांच्या निदर्शनास आले. शिष्यवृत्तीच्या नियमांनुसार, ही माहिती ३० वर्षांसाठी जतन करणे बंधनकारक आहे. ज्या कालावधीत ही माहिती नष्ट झाली, त्या दरम्यान कार्यरत असलेले तत्कालीन चार सहाय्यक आयुक्त आणि तीन लिपीक यांनी शासकीय नियमांचे उल्लंघन करून माहितीची नोंद आणि जतन करण्याचे आपले कर्तव्य हेतुपुरस्सर टाळले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या कृतीमुळे शिष्यवृत्ती घोटाळ्याची शंका उपस्थित होत असून, शासकीय कागदपत्रे नष्ट केल्याबद्दल वरील सर्व सात जणांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे करीत आहेत.

# साडेआठ लाखांचा गुटखा जप्त

अहिल्यानगर । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडक कारवाई करत साडेआठ लाखांचा गुटखा जप्त केला. याप्रकरणी प्रशांत प्रभाकर आव्हाड यास अटक करण्यात आली असून, प्रभाकर गुळवे आणि सलिम सय्यद फरार झाले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून गुटख्याची तस्करी केली जात असल्याची माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक बाळासाहेब नागरगोजे यांच्या पथकाने भिंगार नाल्याजवळील रस्त्याच्या कडेला सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३ लाख ५० हजार रुपये किमतींचा गुटखा ५ लाख रुपये किमतीचे चार चाकी वाहन असा साडेआठ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. शासकीय आदेशाचे उल्लंघन करून मानवी शरीरास अपायकारक पदार्थांची विक्री करण्याचा उद्देशाने हा साठा बाळगल्याप्रकरणी कॅम्प पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता आणि अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कॅम्प पोलीस स्टेशनचे पोसई राजेंद्र इंगळे हे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

# वाघ्या-मुरळी कलावंतांकडून चंपाषष्ठी उत्सवात साताऱ्यातील खंडोबाच्या भक्तीची सेवा

## नवसापोटी 'मुरळी' म्हणून अर्पण; चौथीपासून खंडोबाचे जागरण-गोंधळ

छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबाच्या चंपाषष्ठी उत्सवानिमित्त मंदिराच्या परिसरात सातारा परिसरासह जिल्ह्याबाहेरील अनेक वाघ्या-मुरळी कलावंत जागरण-गोंधळ अन्? तळी भरत होते. मंदिराच्या चारही बाजूंनी गोंधळी हाती तुणतुणे, डफ घेऊन भाविकांकडून तळी भरून घेत होते. यात काही वयोवृद्ध तर काही तरुणांचा सहभाग बघायला मिळाला. या उत्सवात एक महिला हाती तुणतुणे घेऊन खंडोबाचे जागरण करत होती. अवघ्या चौथी वर्गात असल्यापासून जागरण-गोंधळ करून आपला उदरनिर्वाह करत असल्याचे तिने सांगितले.

सातारा परिसरात राहणाऱ्या यमुना माळी सध्या शिवमल्हार जागरण गोंधळ पार्टीत देवाचे जागरण-गोंधळ करतात. आईला मुलगा होत नव्हता म्हणून तिने देवाला नवस केला की, पहिले अपत्य तुला देईन. यामुळे यमुना माळी अवघ्या चौथी वर्गाचे शिक्षण घेत असताना आईने देवासाठी 'मुरळी' म्हणून सोडून दिले. घरात राहून शिक्षण न घेता त्यांनी देवासाठी वाहून घेत देवाची गाणी, भजने गात जागरण-गोंधळ शिकल्या. त्यानंतर आईने त्यांच्या मुलाला 'वाघ्या' म्हणून देवाला अर्पण केले. आजही लग्नानंतर यमुना माळी खंडोबा मंदिरात खंडोबाचे जागरण-गोंधळ करत उदरनिर्वाह करत आहेत. मात्र, त्या सांगतात की, 'आम्ही देवाचा गोंधळ गातो, परंतु आमच्या मुलांना शिक्षण देणार.'

दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले गणेश सुपलकर हे वडिलोपार्जित खंडोबाचे जागरण-गोंधळाचे काम करत आहेत. ते सांगतात की, ते गोंधळी गीतातून लोकनाट्य आणि व्यसनमुक्तिपर समाजप्रबोधनाचे कार्य करत आहेत. पहिले खंडोबाला फार मानत नव्हते. मात्र, मालिकांच्या माध्यमातून आणि जागरण-गोंधळाच्या माध्यमातून जनजागृती होत आहे. हे कलावंत पहाटे ३:३० वाजेपासून ते रात्रीच्या १२ वाजेपर्यंत मंदिरात भाविकांच्या पूजा करत असल्याचे त्यांनी सांगितले. सातारा गावातीलच रहिवासी असलेले भाऊसाहेब मारकळ हे पिढीजात जागरण-गोंधळ करतात. वयाची साठी ओलांडलेले मारकळ आजही खंडोबा यात्रेत तळी भरणे, जागरण-गोंधळ करण्यासाठी पार्टी म्हणून काम करतात. ते सांगतात, 'आम्ही अवघ्या १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत पूजा करतो.'

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
नगरपरिषद प्रशासन विभाग
नगर रोड बीड

फोन क्र. ०२४४२-२२२६०४
ईमेल- dpabeeda@yahoo.com, beeddpo1@gmall.com

जा.क्र. २०२५/जियो/नपाप्र/नप.सा.नि २०२५-२६/आचारसंहिता/ दिनांक: २६/११/२०२५

जाहिर सुचना

मा. राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने गेवराई नगरपरिषदेमध्ये सार्वत्रिक निवडणुकीची कार्यवाही चालू आहे. या निवडणूकीमध्ये वैधरित्या नामनिर्देशीत उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर प्रभाग क्रमांक ११ मधील जागा क्रमांक ११ अ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य पदासाठीच्या वैध उमेदवार श्रीमती. दुरदाना बेगम सलीम फारुकी, यांचे दि. २६/११/२०२५ रोजी गेवराई क्रिटीकल हॉस्पिटल येथे निधन झालेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी, गेवराई नगरपरिषद यांनी आज दि. २६/११/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे अहवाल सादर केला आहे.

महाराष्ट्र नगरपालिका निवडणुक नियम, १९६६ मधील नियम क्र. २३ नुसार मा. राज्य निवडणुक आयोग यांना याबाबत अहवाल सादर करून प्रभाग क्रमांक ११ मधील जागा क्रमांक ११ अ, ११ ब आणि थेट अध्यक्ष पदाच्या निवडणुकीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

त्यानुसार आज दि.२६/११/२०२५ रोजी मा. राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ च्या नियम २३ अंतर्गत नमुद तरतुदी आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० (१) (२) च्या तरतुदींनुसार प्रभागाची विभागणी दोन जागांमध्ये करण्यात येत असल्याने प्रभाग क्रमांक ११ मधील दोन्ही जागा क्रमांक ११ अ आणि ११ ब जागांकरीता निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली असून संबधित प्रभागातील थेट अध्यक्ष पदाची निवडणूक प्रक्रिया नियोजीत कार्यक्रमानुसार सुरु राहील.गेवराई नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत प्रभाग क्रमांक ११ मधील जागा क्रमांक ११ अ, ११ ब सदस्य पदांच्या निवडणुकांकरीता नव्याने निवडणुक कार्यक्रम यथावकाश जाहीर करण्यात येईल. याबाबत सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी नोंद घ्यावी.

आदेशावरून
स्वाक्षरित
निवडणूक निर्णय अधिकारी

# भारतीय बौद्ध महासभेकडून संविधान रक्षणाची शपथ

## संविधान दिनानिमित्त शहर व जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

अहिल्यानगर

भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिणच्या वतीने संविधान दिन उत्साहात व श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि संविधान रक्षणाची शपथ घेण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड, जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव किशोर कांबळे, सचिव गोरख केदारे, रवींद्र कांबळे सर, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस गौतम पाचारणे, तालुकाध्यक्ष नितीन साळवे, अमोल गायकवाड, सुनील पंचमुख, अविनाश राक्षे, राहुल पंडागळे, शशिकांत घोडके, बापू भिंगारदिवे, विजय पाटोळे, परमेश्वर गायकवाड, कचरू थोरात, चिमाजी साळवे, मोहन शिरसाट, आशा भिंगारदिवे, उषा खंडागळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुष्पहार अर्पणानंतर समता सैनिक दलाच्या वतीने उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात जनरल सलामी देण्यात आली. त्यानंतर संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून सर्व उपस्थितांनी स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्व या मुलभूत मूल्यांवर चालणाऱ्या भारतीय संविधानाचे रक्षण करण्याची शपथ घेतली. याप्रसंगी बोलताना आयुष्यमान जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे म्हणाले, संविधानाचा आदर करणे आणि त्याचे रक्षण करणे ही प्रत्येक भारतीयाची कर्तव्य आणि जबाबदारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अंगीकारून समाजाला प्रगत दिशेने नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. प्रतिनिधी । अहिल्यानगर शहरात विविध सामाजिक संस्था व राजकीय पक्ष यांच्यावतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाने दिलेले कर्तव्य, अधिकार आणि मूलभूत मूल्य याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, सर्वांनी संविधानाचा सन्मान आदर करण्याची शपथ घेतली. हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फेही संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्ष संजय सपकाळ व सचिन चोपडा यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राज्यभर विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जिल्ह्यात २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत संविधान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात बुधवारी रॅलीने करण्यात आली. या उपक्रमात सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अमृतेश्वर विद्यालय, अमरापूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चंदनेश्वर विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल तसेच एम.एम. निऱ्हाली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शाळांमध्ये संविधान उद्देशिका वाचन, व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. तसेच भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा अशा प्रकारचे विविध उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही संविधान दिनानिमित्त शपथ घेतली. देशाला एका सूत्रात बांधण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले जिल्हा संस्कार उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, संपूर्ण भारत देशाला एका सूत्रात बांधण्याचे महान कार्य भारतीय संविधानाने केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवलेला हा दस्तऐवज समानतेची आणि लोकशाहीची भक्कम पायाभरणी करतो. त्यांच्या परिश्रमांची आठवण ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. संविधान दिनाचा हा उपक्रम सामाजिक जागृतीचा आणि संविधान मूल्यांच्या प्रसाराचा संदेश देणारा ठरला आहे.

# मकाचे दर घसरल्याने संतप्त शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडला



कन्नड

कृषी उत्पन्न बाजार समितीत गेल्या काही दिवसांपासून मोजक्याच व्यापाऱ्यांनी मकाच्या लिलावात सहभाग घेतल्यामुळे मकाच्या दरात मोठी घसरण झाली आहे. केवळ १,००० ते १,३०० रुपये या दरम्यानच भाव मिळत असल्याने संतप्त शेतकऱ्यांनी दुपारच्या सत्रातील मका लिलाव अचानक बंद पाडला.

तसेच मकाने भरलेल्या काही ट्रॅक्टर बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोर कन्नड-चाळीसगाव रोडवर आडव्या उभ्या करून शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले.

यावर्षी तालुक्यात प्रथमच मोठ्या प्रमाणात मकाची लागवड झाल्याने बाजार समितीत दररोज मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. सोमवार वगळता दररोज दोन सत्रांत लिलाव होतो. मात्र गेल्या काही दिवसांत फक्त पाचसहा व्यापाऱ्यांचाच सहभाग पहायला मिळत असल्याने मकाला उचित दर मिळत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. या निषेधार्थ लिलाव बंद करण्यात आला. लिलाव बंद करताच संतप्त शेतकऱ्यांनी मकाने भरलेल्या ट्रॅक्टर कन्नड-चाळीसगाव रस्त्यावर उभ्या केल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक टी. पी. पवार तथा सहायक फौजदार नासेर पठाण घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत ट्रॅक्टर तेथून बाजार समितीच्या आवारात आणले आणि वाहतूक सुरळीत केली. शेतकऱ्यांनी पोलिसांना बोलवा असा ठाम पवित्रा घेतल्यानंतर पोलिस निरीक्षक रंगराव सानप तातडीने बाजार समितीत दाखल झाले. त्यांच्या उपस्थितीत दुपारचे सत्र सुरू करण्यात आले. २१ ममावचरफ असलेल्या मकाला तब्बल १३ रुपये प्रतिकिलोपर्यंत दर मिळाल्याची माहिती आहे.






# बीडमध्ये तुतारीच्या हवेत पतंगाची भरारी

## इम्तियाज जलील यांचा पराभव मुस्लिमांच्या जिव्हारी

**बीड । प्रतिनिधी**

**बीडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी होणारी निवडणूक अत्यंत सुरक्षेची होत आहे कधी या बाजूने तर कधी त्या बाजूने दिवसेंदिवस कल बदलत असला तरी आता मात्र ज्या समाजाच्या मतावर तुतारी हवेत होती त्याच हवेत पतंगाने भरारी घेतल्याचे दिसत आहे रात्री झालेल्या एमआयएमच्या सभेनंतर वातावरण काहीसे वेगळे झाल्याचे दिसत आहे त्यामुळे आपला नगराध्यक्ष होईल ही अशा आता हळूहळू कमी होताना दिसत आहे.**



मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये दलित आणि मुस्लिम समाजाने मोठ्या प्रमाणात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मदत केली होती आणि याच मदतीच्या जोरावर विजय देखील मिळवला होता त्याला कारण ही तसेच होते मराठा आंदोलनामध्ये मुस्लिम समाजाने खांद्याला खांदा लावून साथ दिली लोकसभेला मुस्लिम समाजाचे एक गठ्ठा मतदान राष्ट्रवादी शरद पवार यांच्या उमेदवाराला मिळाले तीच परिस्थिती पुन्हा विधानसभेला देखील झाली आणि आताही त्याच पद्धतीने निवडणूक जिंकली जाईल असे राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाला वाटत होते मात्र आता वातावरण वेगळे बनत चालले आहे ज्या समाजाने मराठा आंदोलनाला साथ दिली तुतारीला निवडणुकीत साथ दिली मात्र त्याच दरम्यान एमआयएमचे नेते इम्तियाज जलील हे संभाजीनगर मध्ये उभे असताना त्यांना मात्र समाजाने डावलले आणि त्यांचा पराभव झाला आणि शिंदे गटाचे संदिपान भुमरे विजयी झाले मात्र त्यानंतर काही दिवसांनी इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषद घेत तुम्हाला मुस्लिमांची मते चालतात मात्र मुस्लिम उमेदवार जमत नाही हे वक्तव्य केले होते आता त्याच पराभवाचे शल्य मुस्लिम समाजामध्ये आहेत त्यामुळे एम आय एम चा उमेदवार आणि त्याची बाजू या पाठिंबामुळे भक्कम होताना आज स्थितीला तरी दिसत आहे आमदार संदीप क्षीरसागर माजी आमदार सय्यद सलीम यांच्या पाठीमागे केवळ मुस्लिम समाजच नव्हे तर इतर समाजही मोठ्या संख्येने आहे मात्र आता इतर पक्षाने जसे उमेदवार मुस्लिम समाजाच्या मतासाठी दिले तसाच उमेदवार आमदार संदीप क्षीरसागर यांनी देखील द्यायला हवा होता अशी काहीची भावना आहेत मात्र तसे न झाल्यामुळे हा समाज पर्यायाने दुसऱ्या बाजूला झोपला गेला आहे आणि मतदारसंघात असे उघडपणे बोलत आहेत एम आय एम चे नेते इम्तियाज जलील यांची रात्री बीडमध्ये झालेली सभा पाहता वातावरणच ढवळून निघाले आहे आत्तापर्यंत ज्या तुतारीची हवा होती त्या सुतारीच्या हवेवर आता पतंगाने भरारी घेतल्याचे दिसत आहे मुस्लिम बहुल भागामध्ये आपलाच उमेदवार हवा अशी मानसिकता मतदाराच्या मनात निर्माण झाल्यामुळे तुतारीच्या उमेदवाराची मोठी अडचण निर्माण झाली आहे ही अडचण म्हणजे आमदार संदीप क्षीरसागर आणि माजी आमदार सय्यद सलीम यांची देखील झाली अशीच म्हणावी लागेल शिवाय राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने उमेदवार तगडा दिला असला तरी अद्यापही राज्यावरच्या कोणत्याच नेत्याची सभा झालेली नाही त्यामुळे आणखीही तुतारीची उमेदवार नेत्यांच्या सभेच्या प्रतीक्षेत आहे हे त्या चार-पाच दिवसांमध्ये सभा झाली तर त्याचा फारसा परिणाम होईलच हे सध्या तरी सांगता येत नाही कारण राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून यापूर्वी अजित पवार गटाने दिलेल्या उमेदवाराच्या नावाची चर्चा होती मात्र त्याला उमेदवारी दिली गेली नाही ऐनवेळी चर्चेत असलेल्या उमेदवाराला अजित पवार गटाने उमेदवारी दिली त्यामुळे देखील मोठी नाराजी दिसत आहे शिवाय अनेक निष्ठावंत कार्यकर्ते उमेदवारीची अपेक्षा लावून होते त्यांना न मिळाल्याने त्यांच्याही नाराजीचा फटका नगरपालिका निवडणुकीत बसणार असल्याचे बोलले जात आहे. नगरपालिका निवडणूकीने नगर परिषदेचा खडा न् खडा आणि तांत्रिक माहिती केवळ माजी आमदार सय्यद सलीम यांनाच आहे परंतु ते १ लाख ८० हजार मतदारांना तोंड देतील का? त्यांच्या एका प्रचारावर सर्व यंत्रणा चालेल हे सांगता येत नाही त्यामुळे तुतारीच्या या हवेने आता मात्र पतंग भरारी घेत असल्याचे चित्र आहे.

### वाघमारे पती-पत्नी उमेदवार कसे?

स्थानिक स्वराज्य संस्था ही निवडणूक नेत्यांची नाही तर कार्यकर्त्यांची असते असे नेहमी भाषणात छाती ठोकून सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात एकाच घरात दोन उमेदवार म्हणजे इतर कार्यकर्त्यांनी फक्त झेंडे हातात घ्यायचे का असाही सव्वा लोकसभेत केला जात आहे नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीकडून स्मिता वाघमारे तर त्यांचे पती विष्णू वाघमारे हे देखील नगरसेवक म्हणून उभे आहेत त्यामुळे देखील कार्यकर्त्यांची नाराजी दिसून येत आहे.





### सासू,जावई,दाजी यांच्या नावाने मागितली जातात मते

विधानसभा निवडणुकीमध्ये मराठा ओबीसी अशी दरी निर्माण झाली होती त्यावेळी शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्यांनी भाषणात आमच्या दाजींना म्हणजे संदीप भैयांना मत द्या त्यांच्या पाठीशी आम्ही आहोत असे आवाहन केले तर नगरपालिकेत एका राष्ट्रवादीकडून दिलेल्या उमेदवारास चा जावई माझ्या सासूला मत द्या दुसरीकडे एम आय एम चा उमेदवार माझ्या पत्नीला तर त्यांचे नातलग माझ्या लेकीला मत द्या म्हणून प्रचार करताना दिसत आहेत

## प्रलंबित अनुदान, बिबट्याचा बंदोबस्त व इतर मागण्यांसाठी शुक्रवारी पिंपरी घाटा येथे शेतकऱ्यांचा रास्ता रोको

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या फळबाग व इतर शेतकऱ्यांचे प्रलंबीत अनुदान तात्काळ वितरीत करा तसेच विजपुरवठा सुरळीत करणे आणि बिबट्याचा बंदोबस्त करणे व इतर मागण्यां त्वरित मान्य करा अन्यथा आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी येथे अहिल्यानगर बीड रस्त्यावर शुक्रवारी दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सकाळी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा या परिसरातील



शेतकऱ्यांनी आष्टीच्या तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

याबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अंकुश तळेकर व इतरांनी तहसीलदार वैशाली पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घाटा पिंपरी, देवळाली येथे धामणगाव येथील विद्युत उपकेंद्रातून होणारा विद्युत पुरवठा होतो, परंतु बिबट्यामुळे दिवसा करुन उच्च दाबाने सुरळीत करावा. देवळाली , घाटा, पिंपरी परीसरात बिबट्यांच्या दहशतीमुळे शेतकरी भितीने वावरत आहेत. शेतातील कोणतेही कामे शेतकऱ्यांना बिबट्याच्या भितीमुळे करता येत नाहीत त्यामुळे वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करा.

अतिवृष्टीमुळे व पुरामुळे नुकसान झालेल्या फळबाग व इतर

## विरोधकांची मक्तेदारी मोडून टाकू -आ. विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेवर ३५ वर्षे राज्य कारभार केला, परंतु शहरातील नागरीकांचे मुलभूत प्रश्न त्यांना सोडवता आले नाही. इथला पाणी प्रश्न गंभीर आहे, रस्ते, नाल्या नाही, अनेक प्रश्न भिजत पडलेले आहेत. विरोधकांनी हुकूमशाही पध्दतीने सत्ता केली. मुस्लिम समाजाने ३५ वर्षे त्यांना साथ दिली पण ऐन मोक्याला आज ते तुम्हाला वाऱ्यावर सोडून गेले आहेत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा धर्मनिरपेक्ष विधारधारेवर चालणारा पक्ष आहे. पक्षाचे नेते आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार



यांनी आपल्यालाल शब्द दिला आहे, तो शब्द पूर्ण करण्यासाठी आपण सहकार्य करा आपल्या सर्वांच्या साथीने आणि सहकार्याने विरोधकांची मक्तेदारी मोडून टाकू आणि बीड शहरात ना. अजितदादा यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचा उदय करू असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. बीड शहरातील विविध प्रभागातील कॉर्नर सभेत मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शिवसेना - शिवसंग्राम - स.पा. आदी मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र. २ मधील उमेदवार सौ. दिपालीताई किशोर धोत्रे, राहुल मधुकर शिनगारे तसेच प्रभाग क्र.१५ मधील डॉ.सुनिता प्रकाश काळे, पांडव अजिंक्य राजेंद्र, प्रभाग क्र. १ मधील धनंजय बाळासाहेब काळे, सौ. सविता भास्कर जाधव आणि प्रभाग क्र.११ मधील शेख फरहत बेगम नसीर आणि शेख मोहम्मद खालेद यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली कॉर्नर सभा झाल्या.

या कॉर्नर सभेला मतदारांनी उस्त्फुर्त प्रतिसाद दिला.

## धोंडीराम जाधव यांची मनसेला सोडचिठ्ठी, शिवसेनेत जाहीर प्रवेश



माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजलगाव येथील संस्थापक सदस्य धोंडीराम जाधव यांनी नुकताच शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

सिंदखेडराजा येथे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते,या सभे मध्ये आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव येथील मनसेचे तालुका अध्यक्ष धोंडीराम जाधव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला आहे

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे राज्य ऊपाध्यक्ष तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड, माऊली फड यांच्यासह जिजामाता यांची जन्मभूमी सिंदखेड राजा येथे झालेल्या सदर कार्यक्रमांमध्ये मनसे तालुका ◀◀ पान ३ वर

## रिपाइंकडून राष्ट्रवादीच्या प्रेमलता पारवेंच्या गुन्ह्यांचे पुरावेच सादर

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत मोठा राजकीय स्फोट झाला आहे. प्रेमलता दादाराव पारवे या ५०० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडल्या गेल्या होत्या, असा थेट पुराव्यासह गंभीर आरोप रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी माध्यमांसमोर केला, आणि त्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

चार दशकांनंतर मागासवर्गीय महिलेला बीड नगराध्यक्ष पदाचे आरक्षण मिळाले असताना, राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी लाचखोर व गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तीस उमेदवारी देण्याचा धक्कादायक निर्णय घेतला, अशी टीका केली जात आहे. राजू जोगदंड यांनी सांगितले की, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांनी पूर्वीच उघड केले होते की प्रेमलता पारवे यांच्यावर लाचखोरीचे गुन्हे नोंद आहेत आणि त्यांचे जावई मुजीब शेख यांच्यावरही गुन्हे आहेत. तरीदेखील ◀◀ पान ३ वर

### असे आहेत गुन्हे दाखल

**प्रेमलता दादाराव पारवे ह्या बीडच्या भू-संपादन कार्यालयात क्लार्क असतांना, एक किरकोळ ना हरकत प्रमाणपत्रासाठी त्यांनी सामान्य शेतकऱ्याकडून दि.२८/०५/२००३ साली ५०० रुपयांची लाच घेतली होती. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन अटक केली होती. तसेच प्रेमलता पारवे व त्यांचा जावई मुजीब शेखवरही सध्या बीड कोर्टात ४२७,४९८ (अ),३२३,५०४,५०६,३४ केस सुरु आहे.**

## आ.सुरेश धस यांची महावितरण अधिकाऱ्यांसोबत बैठक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना सतत जाणवणाऱ्या वीजपुरवठ्याच्या अडचणी तसेच वारंवार खराब होणारे ट्रान्सफॉर्मर या गंभीर प्रश्नांबाबत आ. सुरेश धस यांनी महावितरणच्या कार्यालयात कार्यकारी अभियंत्यांसोबत सविस्तर चर्चा केली.तसेच शेतकऱ्यांना स्थिर आणि दिवसभर वीज उपलब्ध व्हावी यासाठी मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजना शासनाने सुरू केली आहे.मात्र यासाठी होत असलेला विलंब टाळता यावा,यामध्ये खासगी कंपन्यांवर प्रशासकीय नियंत्रण असावे जेणेकरून सौरऊर्जेमुळे शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता वाढेल, पिकांना वेळेवर पाणी मिळेल आणि वीजेवरील अवलंबित्व कमी होईल,याबाबत सविस्तर चर्चा केली.

गेल्या काही दिवसांत अनेक गावांमध्ये ट्रान्सफॉर्मर बाबत शेतकऱ्यांनी आ.सुरेश धस यांचेकडे आपल्या व्यथा मांडल्या होत्या.याबाबत महावितरण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची ◀◀ पान ३ वर

## मोंगलिंग खंडोबा यात्रा महोत्सवासाचा कुस्त्यांच्या सामन्यांनी समारोप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान मोंगलिंग खंडोबा यात्रेचे दि २६ व २७ नोव्हेंबर रोजी दोन दिवशीय मात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या दोन दिवसीय यात्रा महोत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले दि २७ नोव्हेंबर गुरुवार रोजी जंगी कुस्त्यांचा समना पार पाडला आहे तर शेवटची कुस्ती ५१ हजार रुपयांच्या बक्षिसांने दोन दिवशीय यात्रा महोत्सवाची समारोप झाला

माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान



मोंगलिंग खंडोबा यात्रेचे दि २६ नोव्हेंबर बुधवार व दि २७ नोव्हेंबर गुरुवार रोजी दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते दि १८ नोव्हेंबर मंगळवार रोजी देवाची घटस्थापना झाली,तर दि २५ नोव्हेंबर रोजी नागदिवे तर दि २६ नोव्हेंबर बुधवार रोजी यात्रेस प्रारंभ झाला यामध्ये सकाळी ११:०० वाजता गाड्या ओढणे, त्यानंतर देवाचा विवाह सोहळा होणार असुन दुपारी १२:१० वाजण्याच्या सुमारास देवाचा पालखी सोहळा व सबिना निघेल आणी त्यानंतर डोहातील झारी व भंडारा काढण्याचा कार्यक्रम होईल,त्यानंतर महाप्रसाद होईल झाला तर दि २७ नोव्हेंबर गुरुवार सकाळी ११:०० वाजता वारु व नांगर तोडण्याचा कार्यक्रम होणार झाला तर दुपारी १:०० वाजता जंगी कुस्त्यांचे उद्घाटन मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांच्या हस्ते झाले.यावेळी मंदिराचे विश्वस्त व पुजारी शिवराज महाराज भरडे,सरपंच गणेश राठोड,माजी संचालक उध्दव धुमाळ,माजी सरपंच बबनराव पवार,माजी सरपंच शामराव राठोड, उपसरपंच संदिप सावंत,यांची उपस्थिती यावेळी २० रुपायां पासुन ते ११ हजार रुपायां पर्यत कुस्त्या झाल्या तर शेवटची कुस्ती मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांच्या तर्फे ५१ हाजार रुपयांची झाली शेवटच्या ५१ हाजार रुपायांच्या कुस्तीचे बक्षीस वितरण माजी सभापती अशोक डक यांच्या हस्ते करण्यात आले.या जंगी कुस्त्यांच्या सामन्यासाठी सोलापूर , कोल्हापूर जिल्हातुन मोठ्या प्रमाणावर पैलवानांनी हाजेरी लावली.

## भारतीय काँग्रेस पक्षाचा अधिकृत पाठिंबा नाही -दत्ता कांबळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरातील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक रनधुमाळी सुरु असून, गेल्या वीस वर्षानंतर शहरातील सहा प्रभागात बॅलेट मशीनवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे हाताचा पंजा हे चिन्ह असणार आहे.**

नगरपरिषद निवडणूकीच्या अनुषंगाने काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांची पक्षाच्या प्रभारी तालुकाध्यक्षपदी निवड होताच



वेळे अभावी सहा प्रभागात सक्षम उमेदवार देऊन पक्षाला जिवंत ठेवण्याचे काम दत्ता कांबळे यांनी केले आहे.

स्थानिक पातळीवर मित्र पक्ष असणाऱ्या राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला काँग्रेस विचाराच्या मतांची गरज वाटत नसल्याने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष सहा प्रभागातील उमेदवार यांना निवडून आणण्यासाठी शरतीचे प्रयत्न करणार असून, अद्याप पर्यंत कुठल्याही पक्षाला स्थानिक पातळीवर आपला अधिकृत पाठिंबा नसल्याचं तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले असून, सर्व काँग्रेस ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# खेड तालुक्यात पूर्ववैमनस्यातून जुन्या मित्राचा गोळ्या घालून खून

**खेड । प्रतिनिधी**

लादवड कोळेकरवस्ती, (ता खेड) येथे गुरुवारी (दि. २७) एका २३ वर्षीय युवकाचा गोळ्या घालून खून करण्यात आला. केतन श्यामराव कारले असे या घटनेतील मृत युवकाचे नाव आहे. केतन हा टाटा फिकोसा कंपनीत नोकरी करत होता, त्याची पत्नी कुमकुम (वय, २१) यांच्या फिर्यादीवरून खेड पोलिसांनी शुभम संतोष तांबे (वय, २१) आणि त्याच्या दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी दिली.

कुमकुम यांच्या तक्रारीनुसार, त्या आणि त्यांचे पती केतन गुरुवारी सकाळी खेड न्यायालयात एका प्रलंबित खटल्याच्या तारखेसाठी घरून निघाले होते. ते काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून (एमएच १४ केवाय ३७७०) प्रवास करत होते. लादवडच्या कोळेकरवस्ती येथे



पोहचल्यावर कुमकुम यांनी वॉशरूमसाठी थांबण्यास सांगितले. केतन यांनी गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली आणि कुमकुम बंद दुकानाच्या मागे गेल्या. तेव्हाच दोन-तीन गोळ्यांच्या आवाजाने त्या घाबरल्या आणि बाहेर येऊन पाहिले असता, शुभम तांबे हा त्याच्या मोटारसायकलवर बसलेला होता आणि त्याच्या हातात पिस्तूल होते. त्याच्याबरोबर दोन अज्ञात व्यक्ती होत्या, ज्या केतन यांच्या दुचाकीवर बसल्या होत्या. कुमकुमने आरडाओरड केली, तेव्हा शुभम आणि त्याचे साथीदार माझ्या पतीची मोटारसायकल घेऊन पळून गेले. त्यांनी तातडीने सासू जानता कारले यांना फोन केला. सासू घटनास्थळी पोहचल्या आणि दोघींनी एका पिकअप गाडीच्या मदतीने केतन यांना चांडोली ग्रामीण रुग्णालयात नेले. तेथे डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

हे प्रकरण जुन्या वैमनस्य आणि न्यायालयीन खटल्याशी संबंधित असल्याचे आढळून आले आहे. कुमकुम यांच्या सांगण्यानुसार, केतन यांचे शुभम तांबे आणि अंकुर रमेश कारले (वय २३) यांच्याशी पूर्वीचे मैत्रीचे संबंध होते. सन २०२२ मध्ये कुमकुम आणि केतन यांचे लग्न झाले. लग्नानंतर अंकुरने केतन यांना धमक्या दिल्या होत्या. नोव्हेंबर २०२३ मध्ये दिवाळीच्या वेळी चांदुस येथे अंकुरने शुभम तांबेवर गोळीबार केला होता, ज्यात शुभम जखमी झाला होता. याप्रकरणी खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. केतन याला अटक झाली होती, पण दोन महिन्यांनी जामिनावर सुटका झाली. यानंतर न्यायालयीन तारखांना येताना केतन याला शुभमकडून धमक्या मिळत होत्या. शुभम आणि केतन पूर्वी मित्र होते, पण वैरामुळे हे घडले, असे त्यांचे म्हणणे आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असून, अज्ञात आरोपींना ओळखण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शुभम तांबे आणि त्याचे साथीदार फरार आहेत. खेड परिसरात या घटनेमुळे तणाव निर्माण झाला असून, पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे.

# लाखेवाडीत ५५०० विद्यार्थ्यांनी साकारले मानवी 'अशोकचक्र'; संविधानाला अनोखी सलामी

**इंदापूर । प्रतिनिधी**

लाखेवाडी (ता. इंदापूर) येथील जय भवानीगड विकास प्रतिष्ठान संचलित शिक्षणसंस्थांनी संविधान दिनानिमित्त एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. राष्ट्रीय मूल्यांचे दर्शन घडवणारा हा सोहळा भव्यदिव्य उत्साहात पार पडला.विद्या निकेतन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, प्रेसिडेन्सी इंटरनॅशनल स्कूल, विद्यानिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी आणि विद्यानिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन विशेषपणे साजरा करण्यात आला.

या उपक्रमाची विशेष आकर्षकता म्हणजे ५५०० विद्यार्थ्यांनी सामूहिक संविधान वाचन करून भारतीय लोकशाहीला एकसुरात सलामी दिली. विद्यार्थ्यांच्या आसनरचनेतून ७५ वा संविधान



दिन हे अक्षरलेखन आणि अशोकचक्र साकारण्यात आले. हा दृश्य सोहळा उपस्थितांना थक्क करणारा ठरला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे आणि संविधान उद्देशिकेचे पूजन करून झाली. प्रास्ताविक प्रा. गणेश पवार यांनी केले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या वेशभूषेतील सादरीकरणातून स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास जिवंत केला. देशभक्तिपर गीत आणि ऑपरेशन सिंदूरवरील नृत्य सादरीकरणाने वातावरण अधिकच भारावून गेले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमच्या सामूहिक गाण्याने झाली. कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष श्रीमंत ढोले, उपाध्यक्षा डॉ. चित्रलेखा ढोले, सचिव हर्षवर्धन खाडे पाटील, मुख्य सल्लागार प्रदीप गुरव, विश्वस्त पृथ्वीराज ढोले, हृषीकेश ढोले, विविध कॉलेजचे प्राचार्य, शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या उपस्थितीत सहभागी झाले.

# पुण्याच्या पुस्तक महोत्सवाची चर्चा आता थेट दिल्लीत! मुरलीधर मोहोळांनी व्यक्त केला 'हा' मोठा विश्वास

**पुणे । प्रतिनिधी**

विद्येचे माहेरघर असलेले पुणे हे बुद्धिवंतांचे शहर असून, राज्याची सांस्कृतिक राजधानी आहे. पुण्यनगरीच्या या वैभवात पुणे पुस्तक महोत्सव भर घालत असून, वाचन संस्कृती बळकट करत आहे. या महोत्सवाची ख्याती आता दिल्लीतही पोहोचली आहे. पुणेकरांच्या उत्साहामुळे या महोत्सवाची व्यापकता व भव्यता वाढत असून, यंदाही हा महोत्सव नवा विक्रम प्रस्थापित करेल, असा विश्वास केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बुधवारी व्यक्त केला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सव १३ ते २१ डिसेंबर या कालावधीत फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. त्यानिमित्ताने संविधान दिनाचे औचित्य साधत यंदाच्या तिसऱ्या पुणे



पुस्तक महोत्सव कार्यालयाचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. फर्गसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या प्रांगणात झालेल्या या सोहळ्याला उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पत्रकार अरुण खोरे, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अरुणा ढेरे, पुणे पुस्तक महोत्सवाचे प्रमुख संयोजक राजेश पांडे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, लोकमान्य सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, महोत्सव संयोजक प्रसेनजित फडणवीस आणि आनंद काटीकर, तसेच बागेश्री मंठाळकर आणि डॉ. संजय चाकणे उपस्थित होते.

मोबाइल आणि समाजमाध्यमांच्या काळात पुणे पुस्तक महोत्सवातून पुस्तक वाचनाबाबतची जागृती होत आहे. पुणेकर वाचत आहेत, या उपक्रमातून वाचन चळवळीला नवे बळ मिळत आहे. त्यामुळे हा महोत्सव राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध पावला असून, संसदेच्या अधिवेशनातही त्याची चर्चा होत आहे, असेही मोहोळ यांनी नमूद केले.संयोजक आनंद काटीकर यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सुनील भणगे यांनी आभार मानले.

# आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू

## आंदेकरच्या खात्यात २१ कोटी ६० लाख

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील कुख्यात गुंड बंडू** आंदेकर व पुतण्या शिवम आंदेकर यांच्या बँक खात्यामध्ये तब्बल २१ कोटी ६० लाख रुपये जमा असल्याची माहिती समोर आली आहे, मासळी बाजारातील व्यापाऱ्यांकडून घेतलेल्या खंडणीतून (झींपश उीळाश छशुी) ही रक्कम जमा झाली असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. बंडू ऊर्फ सूर्यकांत राणोजी आंदेकर, त्याचा मुलगा कृष्णा आंदेकर, पुतण्या शिवम उदयकांत आंदेकर यांच्यासह अकरा जणांविरोधात फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा (झींपश उीळाश छशुी) दाखल करण्यात



आला आहे. व्यापाऱ्याने याबाबत तक्रार दिली आहे.

आंदेकर टोळीने संघटितरीत्या व्यापाऱ्यांकडून २० कोटी रुपयांहून अधिक खंडणी घेतलेली आहे. जागा उपलब्ध करून देणे किंवा व्यवसायात सहकार्याच्या नावाखाली व्यापाऱ्यांना धमकातून ही खंडणी वसूल केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यात आरोपी बंडू आंदेकर व शिवम आंदेकरला पुणे न्यायालयात हजर करण्यात आले आहे. आरोपींना पोलिस कोठडी देण्याची मागणी विशेष सरकारी वकील विलास पटारे यांनी केली. आरोपींच्या वतीने ॲड. मिथुन चव्हाण आणि ॲड. ए. एस. धीवार यांनी बाजू मांडली. पोलिस कोठडी मागण्यासाठी कोणताही आधार नसल्याचा युक्तिवाद ॲड. चव्हाण यांनी केला.

आरोपींना सुनावली तीन दिवसांची पोलिस कोठडी

दोन्ही बाजू ऐकल्यावर विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. आरोपी कृष्णा आंदेकर पोलिस कोठडीत असताना त्याची परेड काढल्याबाबत बचाव पक्षाचे वकील ॲड. मिथुन चव्हाण यांनी न्यायालयाकडे तक्रार केली. न्यायालयाने बचाव पक्षाच्या तक्रारींची दखल घेत पुणे पोलिसांवर ताशेरे ओढले. कोठडीतील आरोपींची सार्वजनिक ठिकाणी परेड काढणे कायद्याला अपेक्षित नाही आणि योग्यही नाही, असेही यावेळी कोर्टाने सुनावले.

# पुण्यात घरातच थाटले हुक्का पार्लर; ऑर्डरप्रमाणे देत होते सर्व्हिस; तिघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

घरात हुक्का पार्लर थाटून, फोनद्वारे ऑर्डर घेऊन सर्व्हिस देणाऱ्या तिघांना विमानतळ पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून ३४ हुक्का पॉट, शेगडी, फिल्टर पाईप, चिलीम, हुक्का फ्लेवर्स असे एक लाख रुपयांचे साहित्य जप्त केले आहे.पोलिसांच्या कारवाईच्या धाकाने तिघांनी घरातूनच हुक्का पार्लर सुरू करण्याची नामी शक्कल लढविल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

अश्रफ निजाम्मुदीन अन्सारी (वय.२५), असलान फिरोज अन्सारी (वय.२४),गुलजार निजामुद्दीन अन्सारी (वय.२५,राहणार तिघे सद्या म्हाडा कॉलनी विमाननगर, मुळ. उत्तरप्रदेश) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी, पोलिस कर्मचारी हरीप्रसाद नवनाथ पुंडे यांनी विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी या तिघांच्या विरुद्ध तंबाखुजन्य उत्पादने अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानतळ पोलिसांचे पथक गस्तीवर होते. त्यावेळी पोलिस उपनिरीक्षक नितीन राठोड यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लेन क्रमांक पाच, म्हाडा कॉलनी येथे



तिघेजण अवैधपने हुक्का विक्री करत आहेत. त्यानुसार बुधवारी (दि.२६) सायंकाळी सव्वा सात वाजताच्या सुमारास पथकाने म्हाडा कॉलनीतील एका सदनिकेत छापा टाकला. यावेळी तिघा आरोपींनी विविध प्रकारचे हुक्का फ्लेवर्स, तसेच हुक्का ओढण्याच्या साहित्याचा साठा केल्याचे दिसून आले. पोलिसांनी हे सर्व साहित्य जप्त केले आहे. चौकशी हे तिघे ग्राहकांना ऑर्डर मिळले त्या प्रमाणे बाहेर जाऊन हुक्का सर्व्हिस देत असल्याचे समोर आले आहे. ही कामगिरी पोलिस उपायुक्त सोमय मुंडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोविंद जाधव, गुन्हे निरीक्षक शरद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नितीन राठोड यांच्या पथकाने केली आहे

# मी पोलीस आयुक्तांना घाबरत नाही! सहकाऱ्याला जीवे मारण्याची धमकी देणारा पोलीस कर्मचारी निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा कारागृहातून शिवाजीनगर कोर्टात सुनावणीसाठी नेण्यात येणाऱ्या कैद्यांच्या बंदोबस्तासाठी नेमलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्याने सहकाऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिली. मी पोलीस आयुक्तांना घाबरत नाही, असे सुनावत सहकाऱ्याला दगड फेकून मारण्याचा प्रयत्न केला. याची गंभीर दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्याला पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांनी निलंबित केले आहे.




केशव महादू इरतकर असे निलंबित पोलिसाचे नाव आहे. तो शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात नियुक्तीस आहे. कैद्यांच्या बंदोबस्तावर नियुक्ती असताना ११ नोव्हेंबर रोजी इरतकर येरवडा कारागृहात कैद्यांना आणण्यासाठी गेले होते. त्याच्यासोबत संदीप नाळे बंदोबस्तास होते. यावेळी दोघांत किरकोळ कारणावरुन वाद झाला. तुम्ही निवृत्त सैनिक काही कामाचे नाहीत.माझ्याविरुद्ध दोन गुन्हे दाखल आहेत. मी पोलीस आयुक्तांना घाबरत नाही, असे सुनावले. पोलीस उपनिरीक्षक धायगुडे यांनी त्याला समजावून सांगितले. इरतकरने नाळे यांना शिवीगाळ केली. रस्त्यावर पडलेला दगड उचलून जीवे मारण्याची धमकी दिली. या वर्तुणकीबाबतचा अहवाल वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांना पाठविला. याप्रकरणी चौकशी केली. सार्वजनिक ठिकाणी इरतकरने केलेले वर्तन पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणारे, अशोभनीय असल्याने पोलीस उपायुक्त शिवणकर यांनी त्याला निलंबित केले.

# मैत्रीच्या गणपतीच्या दानपेटीतील दीड लाखांची गोशाळेस भेट; सामाजिक बांधिलकी जपत अनोखा उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात 'मैत्रीच्या गणपती'ला भाविकांकडून मिळालेल्या दानातील तब्बल दीड लाख रुपये भिवरी येथील 'गुरुमाँ डॉ. मंजूश्री गोशाळे'ला अर्पण करण्यात आले. प्रमुख उद्योगपती मनोज छाजेड यांच्या वाढदिवसानिमित्त दानपेटीतील सर्व रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या कार्याचे समाजात सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रसंगी मैत्रीच्या गणपतीचे प्रमुख मनोज छाजेड, गोशाळेचे अध्यक्ष ललित जैन, मुकेश छाजेड, रमणलाल शिंगवी, डॉ. सुमतीलाल लोढा, प्रकाश संचेती, जीवन बेद, योगेश मोहोळ, उमेश पाथरकर, शीतल भंडारी, नीरज कांकरीया, सिद्धांत छाजेड, संदेश कदम, महेश सावंत, मनोज रावत आदी मान्यवर



उपस्थित होते.

सिद्धी फाऊंडेशनच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, गोरगरिबांना मदत असे अनेक उपक्रम नियमित राबविले जातात. संस्थापक अध्यक्ष मनोज छाजेड हे जीतो, लायन्ससह विविध सामाजिक संस्थांमध्ये सक्रिय असून, समाजकार्यात अग्रणी भूमिका बजावत आहेत. छाजेड म्हणाले, भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेली रक्कम सामाजिक व धार्मिक हितासाठी वापरण्याचा आमचा निर्णय आहे. या माध्यमातून समाजोपयोगी कार्यात खारीचा वाटा उचलल्याचा आनंद वाटतो. तर ललित जैन यांनी छाजेड यांचा गौरव करताना सांगितले, समाजहिताचा विचार करून गोशाळेस दिलेली मदत हा उपक्रम कौतुकास्पद आहे. छाजेड परिवार गेले १८ वर्षे 'मैत्रीचा गणपती' उपक्रम साजरा करून कौटुंबिक नाती अधिक दृढ करीत आहेत.

# इन्स्टाग्रामवर व्हिडिओ टाकण्याची धमकी; फुरसुंगीत 'त्या' दोन कथित पत्रकारांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

फुरसुंगीत पुरोहित स्वीट मार्टमधील कर्मचारृ यांशी वाद घालून दुकानाची बदनामी करणारा व्हिडिओ इंस्टाग्रामवर टाकत एका कथित पत्रकाराने एक लाखाची खंडणी मागितली आहे. याप्रकरणी पत्रकारासह दोघांवर फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.राहुल मच्छिंद्र हरपळे (रा. फुरसुंगी), माऊली चव्हाण (रा. फुरसुंगी) आणि अन्य यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

खिमसिंह ओमसिंह राजपुरोहित (वय ४२, रा. फुरसुंगी) यांनी फिर्याद दिली आहे. १७ आणि १८ नोव्हेंबर रोजी ही घटना घडली. फिर्यादीनुसार दोघेजण दुकानात आले. त्यांनी तुमच्या काजू मसाल्यामध्ये आळ्या निघाल्या असे सांगून मॅनेजरशी वाद घातला. व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ही चूक दुकानाची असल्याचे कबूल करावे अशा शब्दात धमकावले. सायंकाळी राहुल हरपळे दुकानात आला आणि स्वत:ला यूट्यूब चॅनेलचा पत्रकार असल्याचे सांगत काजू मसाल्यातील आळ्यांचा व्हिडिओ इंस्टाग्रामवर टाकल्याची धमकी दिली. बदनामी टाळायची असेल तर ५० हजार द्यावे, अशी मागणी त्याने केली. फिर्यादींनी व्हिडिओ खरा नसल्याचे सांगत त्याला विरोध केल्यावर हरपळे संतापून निघून गेला. यानंतरही हरपळेने व्हिडिओ इंस्टाग्रामवर अपलोड केल्याचा दावा करत तो दीड लाख लोकांनी पाहिला असून दुकान बंद पडेल, अशी धमकी दिली. व्हिडिओ डिलिट करण्यासाठी एक लाख मागितले. पोलिसांकडे गेले तर मार्केटमध्ये फिरताना अडचणीत आणू, सांभाळून राहा, असेही बजावले. फिर्यादींनी पोलिसांत फिर्याद नोंदवल्यावर हरपळेसह दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# कमी दरात स्क्रॅप मटेरियल पुरवठा करण्याचं अमिष, कोट्यावधी रुपयांची फसवणूक, मोठे रॅकेट समोर

**पुणे । प्रतिनिधी**

दुबई टांझानियाचे स्क्रॅप मटेरियल भारतात आणून कमी दरात पुरवठा करण्याचे आमिष दाखवून पुण्यातील व्यापाऱ्याची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. दुबई, टांझानिया येथे जाऊन विश्वास संपादित करत व्यापाऱ्याची फसवणूक केली आहे. व्यापाऱ्यांना 'स्क्रॅप मटेरियल' पुरवण्याचा बहाण्याखाली फसवणुकीचे मोठे रॅकेट समोर आले आहे. भारतातील विविध शहरातील व्यापाऱ्यांची फसवणूक करण्यात आली आहे. रॅकेटचा मुख्य सूत्रधार भूपेंद्रसिंग उर्फ संजय कुमार राघव याला पुणे पोलिसांनी अटक केली आहे.



दुबई व टांझानिया देशातून कमी दरात 'स्क्रॅप मटेरियल' मिळवून भारतात पुरवठा करण्याचे आमिष दाखवून अनेक व्यावसायिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या मोठ्या रॅकेट पुण्यातील खडक पोलिसांनी उघडकीस आणलं आहे. या प्रकरणात मास्टरमाईंड ला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी एका व्यावसायिकाने खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील रविवार पेठेत असणाऱ्या एका व्यापाऱ्याला तांब्याची भांडी बनण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कच्चा माल लागतो. डिसेंबर २०२३ मध्ये या व्यापाऱ्याची मुंबईत इंडो आर्फी मेटलस आणि सबपर्ला इंटरनॅशनल एल एल पी चे मालक भूपेंद्रसिंग उर्फ संजय कुमार राघव आणि त्याचा मुलगा पनवीरसिंग राघव याच्याशी झाली. या दोघांनी त्या व्यापाऱ्याला दुबई येथे ऑफिस असून त्यांना लागणाऱ्या स्क्रॅप मटेरियल ची कंपनी टांझानिया मध्ये असल्याची बतावणी केली. त्यांच्या भूलथापाला बळी पडून संबंधित फिर्यादी हे त्यांच्यासोबत दुबईला गेले तसेच पुढे टांझानिया येथे गेले. विश्वास संपादन करण्यासाठी या बाप लेकांनी त्यांना स्क्रॅप मटेरियलचा तब्बल ७५ टन माल दाखवला. हा माल भारतात निर्यात केला जाईल असं सांगितलं. विश्वास संपादन झाल्युळे संबंधित व्यावसायिकाने त्यांच्याशी करार केला. या व्यवहारापोटी व्यावसायिकाकडून ३ कोटी ७९ लाख ७७ हजार रुपये अबू धाबी येथील बँकेत स्वीकारले गेले. रक्कम भरल्यानंतर व्यावसायिकाला आजपर्यंत कुठलाही कच्चा माल नाही मिळाला, न त्यांनी भरलेले पैसे परत मिळाले. याबाबत व्यापाऱ्याने खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर हा सगळा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणाची तक्रार दाखल होताच खडक पोलिसांनी तपास करायला सुरुवात केली. तपासादरम्यान राघव हा कोलकाता येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. खडक पोलिसांच्या एका पथकाने थेट कोलकाता गाठलं आणि राघव याला ताब्यात घेतलं. या बाप लेकांनी मिळून कोलकाता, केरळ, ओडिशा, पंजाब सारख्या राज्यातील अनेक शहरात अनेकाना फसवलं असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे

# अर्थकारणातून निवडणूका जिंकायच्या असतील तर भाष्य न केलेले बरे-शरद पवार

**बारामती । प्रतिनिधी**

राज्यात नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूकीत महायुतीतील प्रमुख नेते निधीबद्दल करत असलेल्या वक्तव्याचा ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी खरपूस समाचार घेतला. अर्थकारणातून निवडणूका जिंकायच्या असतील तर त्यावर भाष्य न केलेले बरे, असे पवार म्हणाले.

बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते. पवार म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचाराच्या निमित्ताने महायुतीतील प्रमुख नेत्यांमध्ये ही जी काही चढाओढ चालू आहे की, पैसे किती द्यायचे.. मत मागतोय.. कामाच्या जोरावर नव्हे तर पैसे घे निधी घे असे एकंदरीत चाललेले दिसतेय. आणि ही गोष्ट चांगली नाही. अर्थकारण आणून निवडणूका जिंकायच्या हा दृष्टीकोन असेल तर त्यावर न बोललेलेच बरे. स्थानिक स्वाज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडल्या



वरून सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी होणार आहे. याबाबत विचारले असता पवार म्हणाले की, याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा अप्रोच फार स्ट्राँग दिसतोय. त्यामुळे त्यांचा अंतिम निर्णय पुढील दोन दिवसात काय येईल हे सांगता येत नाही. असे पवार म्हणाले.